महाराष्ट्र शासन

विधी व न्याय विभाग

# सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम, १९७६

(दिनांक २२ जुलै १९९७ पर्यंत सुधारलेला)

# Maharashtra Act No. XLVIII of 1976

## The Maharashtra Jeevan Authority Act, 1976

(*As modified up to the 22nd July 1997*)

MAHARASHTRA WATER SUPPLY & SEWERAGE BOARD
LIBRARY BOOK NO
BOMBAY

PRINTED IN INDIA BY THE MANAGER, GOVERNMENT CENTRAL PRESS, MUMBAI AND PUBLISHED BY THE DIRECTOR, GOVERNMENT PRINTING, PUBLICATIONS AND STATIONERY, MAHARASHTRA STATE, MUMBAI 400 004.

1998

[ *Price* Rs. 10.00 ]

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम, १९७६

## अनुक्रमणिका

उद्देशिका

कलमे

### प्रकरण एक

प्रारंभिक


१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

२. व्याख्या.


### प्रकरण दोन

प्राधिकरणाची स्थापना, त्याचे कामकाज चालवणे व त्याची कर्तव्ये आणि अधिकार


३. प्राधिकरणाची स्थापना.

४. प्राधिकरणाची रचना.

५. अशासकीय सदस्य होण्यासाठी अनर्हता.

६. सदस्यांचा पदावधी.

६अ. सदस्यांची तात्पुरती अनुपस्थिती.

७. सदस्यांविषयीच्या इतर तरतुदी.

८. प्राधिकरणाचे अधिकारी व कर्मचारी आणि त्यांचा सेवाप्रवेश व सेवेच्या शर्ती.

९. प्राधिकरणाचे आदेश इत्यादींचे अधिप्रमाणन.

१०. शासनाचे अधिकारी इत्यादींचे सहाय्य.

११. अधिकारांचे प्रत्यायोजन.

१२. हितसंबंधामुळे प्राधिकरणाच्या किंवा समितीच्या कार्यवाहीत भाग घेण्याबाबत अनर्हता.

१३. रिक्त पद, अनौपचारिकता, इत्यादींमुळे कृती विधिअग्राह्य न होणे.

१४. प्राधिकरणाची कर्तव्ये व कार्ये.

१५. प्राधिकरणाचे अधिकार

१६. निदेश देण्याचे व विवरणे, अहवाल, इत्यादी मागविण्याचे प्राधिकरणाचे अधिकार.

१७. पर्यवेक्षण व टक्केवारी खर्च.


### प्रकरण तीन

मालमत्ता, सत्ता, दायित्वे आणि बोजे निहित करणे आणि कर्मचाऱ्यांची बदली


१८. मालमत्ता प्राधिकरणाकडे निहित करणे व तिचे प्राधिकरणाकडे हस्तांतरण करणे.

१९. मालमत्ता निहित करण्याबाबत राज्य शासनाचा निर्णय अंतिम असणे.

२०. विद्यमान पाणीपुरवठा आणि जलनिःसारण सेवा प्राधिकरणाकडे निहित असणे.

२१. स्थानिक संस्थांकडून ताब्यात घेतलेल्या जलदाय व्यवस्थेकरिता हा अधिनियम लागू असेल अशा गोष्टींसंबंधीची दायित्वे प्राधिकरणाने हाती घेणे.

२२. प्राधिकरण आणि इतर स्थानिक संस्था यांच्या कार्यांचे समन्वयन.

२३. शासकीय कर्मचाऱ्यांची प्राधिकरणाकडे बदली करणे.

२३अ. विवक्षित शासकीय कर्मचाऱ्यांना प्राधिकरणाकडे प्रतिनियुक्तीवर पाठविण्याचा शासनाचा अधिकार.

४९. मलप्रणालावर परवानगीशिवाय खाजगी रस्ता किंवा इमारत बांधण्यास मनाई.

५०. मलप्रणाल किंवा मलकुंड (सेसपूल यामध्ये हवा खेळती राहण्यासाठी पोकळ खांब इत्यादी बसविण्याचा अधिकार).

५१. सदोष असल्याचे मानण्यात आलेल्या मलप्रणलांची तपासणी व चाचणी करण्याचा अधिकार.

५२. विवक्षित इतर कृत्यांस मनाई.

५३. प्रवेश सर्वेक्षण इत्यादींचा अधिकार.

५४. तलाव, डबकी व विहिरी जंतूविरहित करण्याचा अधिकार.

## प्रकरण आठ

### शास्ती व कार्यपद्धती

५५. सर्वसाधारण शास्ती.

५६. अपराधाची दखल.

५७. कंपन्यांचे अपराध.

५८. अपराध करणाऱ्या व नाव आणि पत्ता देण्याचे नाकारणाऱ्या व्यक्तीस अटक करण्याचा अधिकार.

५९. अपराध आपसात मिटविणे.

## प्रकरण नऊ

### बाह्यनियंत्रण

६०. धोरणविषयक प्रश्नावर प्राधिकरणास निदेश देणे.

६१. प्राधिकरणाकडून देण्यात येणारा वार्षिक अहवाल, आकडेवारी, विवरणे व इतर माहिती.

## प्रकरण दहा

### संकीर्ण

६२. सहाय्य करण्याचे स्थानिक संस्थांचे कर्तव्य.

६३. भरपाई देण्याचा सर्वसाधारण अधिकार.

६४. सद्‌भावनेने केलेल्या कृत्यांचे संरक्षण.

## प्रकरण अकरा

### नियम, विनियम व उपविधी

६५. नियम.

६६. विनियम.

६७. उपविधी.

# [1] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८.[1]

## [महाराष्ट्र[2] [जीवन प्राधिकरण] अधिनियम, १९७६]

[या अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक १ नोव्हेंबर १९७६ रोजी मिळाली. ही संमती *महाराष्ट्र शासन राजपत्र*, भाग चार मध्ये दिनांक ११ नोव्हेंबर १९७६ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केली.]

या अधिनियमात पुढील अधिनियमांद्वारे व शुद्धिपत्राद्वारे सुधारणा करण्यात आल्या :—

सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८* (२८ सप्टेंबर १९७९) †

सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३‡ (१२ ऑक्टोबर १९८२) †

*महाराष्ट्र शासन राजपत्र*, असाधारण, भाग चार, दिनांक १६ जुलै १९९६ मधील शुद्धिपत्र

सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ (२८ जून १९९६) †

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ (१० मार्च १९९७) †

महाराष्ट्र राज्यात [2][जीवन] सेवांचा जलद विकास व योग्य विनियमन करण्यासाठी [2][जीवन प्राधिकरण] स्थापन करण्याची तरतूद करण्याकरिता अधिनियम.

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यात [2][जीवन] सेवांचा जलद विकास व योग्य विनियमन करण्यासाठी [2][जीवन प्राधिकरण] स्थापन करणे व त्याच्याशी संबंधित इतर बाबी यांची तरतूद करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सत्ताविसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

### प्रकरण एक

### प्रारंभिक

**संक्षिप्त नाव व्याप्ती व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र [2][जीवन प्राधिकरण] अधिनियम, १९७६ असे म्हणावे.

(२) तो, कटक क्षेत्रे सोडून संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू होईल.

(३) तो, राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमील अशा तारखेस [3] अंमलात येईल; आणि या अधिनियमाच्या वेगवेगळ्या तरतुदींसाठी वेगवेगळ्या तारखा नेमता येतील व कोणत्याही तरतुदींतील या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेच्या संदर्भाचा अर्थ, त्या तरतुदींच्या प्रारंभाच्या तारखेचा संदर्भ असा लावण्यात येईल.

---

[1] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी, *महाराष्ट्र शासन राजपत्र*, १९७६, भाग पाच, असाधारण, इंग्रजी पृष्ठ ४७१–४९५ पहा.

[2] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २५ याच्या कलम २ द्वारे "पाणीपुरवठा व जलनिस्सारण" या मजकुराऐवजी हा मजकूर व्याकरणीक फेरफारासह दाखल करण्यात आला.

* सन १९७९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. ९ हा सन १९८० चा महाराष्ट्र अधि. क्र. ८ याच्या कलम ५ (१) द्वारे निरसित करण्यात आली.

† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख दर्शवते.

‡ सन १९८२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. १९ हा सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३ याच्या कलम ६ द्वारे निरसित करण्यात आला.

[3] शासकीय अधिसूचना, नगरविकास व आरोग्य विभाग, क्रमांक डब्ल्यूएसबी-३६७६/६४०९/पुडी/२२, दिनांक १६ डिसेंबर १९७६ द्वारे कलमे १ व २, ३ ते १७, २४ ते ३१, ३३, ३४ व ६० ते ६७, १ जानेवारी १९७७ रोजी अंमलात आली.

व्याख्या. २. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(एक) "मंडळ" म्हणजे, कलम ३ खाली स्थापन केलेले महाराष्ट्र [1][जीवन प्राधिकरण].

(दोन) "उपविधी" म्हणजे, या अधिनियमाखाली केलेले उपविधी;

(तीन) "मलकुंड" या संज्ञेत, कोणत्याही जागेतून दूषित पदार्थ स्वीकारणारी किंवा त्यांची विल्हेवाट लावणारी स्थिरावणी टाकी किंवा इतर टाकी यांचा समावेश होतो ;

(चार) [2][अध्यक्ष] म्हणजे [3][प्राधिकरणाचा] [2][अध्यक्ष]

(पाच) "समनुयोग नळ" (Communication Pipe) म्हणजे; मुख्य नळ मार्गापासून कोणत्याही जागेत ज्याद्वारे पाणीपुरवठा केला जातो असा कोणताही नळ किंवा त्याच्या सर्व जोडण्यासह नळाची यंत्रणा आणि त्यात जोडणी नळ, सेवा नळ, मीटर किंवा इतर जोडण्या यांचा समावेश होतो ;

(सहा) "जोडणी नळ" (Connection Pipe) म्हणजे, स्थानिक संस्थेच्या किंवा यथास्थिती मंडळाच्या मुख्य नळ मार्गास सेवा नळाशी (Service Pipe) जोडणारा लोहवलयापासून (फेरल) स्टॉपकॉकपर्यंतचा कोणताही पाण्याचा नळ;

(सात) "ग्राहक" म्हणजे, स्थानिक संस्थेकडून किंवा यथास्थिति [3][प्राधिकरणाकडून] कोणत्याही पाणीपुरवठ्याचा किंवा जलनिस्सारण सेवेचा लाभ घेणारी कोणतीही व्यक्ती;

(आठ) "घरगुती मलप्रवाह" म्हणजे निवासी जागा, भोजन गृहे आणि निवासगृहे, वसतिगृहे, हॉटेले, सार्वजनिक जागा, कार्यालये व कोणत्याही धंद्याचा किंवा उद्योगाचा भाग नसतील अशा सर्व आस्थापना यातील आणि पाणी पिणे, स्नान, मार्जन इ. करणे धुणे व स्वयंपाक करणे यासारख्या वैयक्तिक आणि सर्वसाधारण मानवी कृतीतून उद्भवणारे सांडपाणी ;

(नऊ) "निस्सारण मार्ग" म्हणजे मैला, घाण पदार्थ, प्रदूषित पाणी, कचरा, सांडपाणी किंवा भूपृष्ठाखालील पाणी (Subsoil water) वाहून नेण्यासाठी किंवा त्यावर संस्करण करण्यासाठी असलेला मलप्रणाल, विवरमार्ग, नळ, खंदक, गटार किंवा जलमार्ग किंवा कोणताही हौद, उद्धावन टाकी (Flash Tank) मलकुंड (Septic Tank) किंवा इतर साधन आणि त्यात अधःप्रणाल (Culvert) वायुवीजनाचे नळकांडे (Ventilation shaft) किंवा नळ किंवा अशा, निःसारण मार्गास जोडलेली इतर उपयंत्रे किंवा जोडण्या आणि कोणतीही उच्चालक यंत्रे (Ejectors) कॉम्प्रेस्ड एअर मेन्स, सीलड स्युएज मेन्स व कोणत्याही जागेतून मैला किंवा घाणेरडे पदार्थ उचलण्यासाठी गोळा करण्यासाठी, काढून टाकण्यासाठी किंवा हलविण्यासाठी असलेली विशेष यंत्रसामग्री किंवा उपकरण संच यांचा समावेश होतो ;

(दहा) "लोहवलय" (Ferrule) म्हणजे, मुख्य मार्गास जोडणी नळ जोडणारे लोहवलय (फेरल).

(अकरा) "स्थानिक क्षेत्र" म्हणजे स्थानिक संस्थेच्या अधिकारितेत येणारे क्षेत्र.

(बारा) "स्थानिक संस्था" म्हणजे त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली स्थापन केलेली महानगरपालिका, नगरपरिषद, जिल्हा परिषद किंवा ग्रामपंचायत.

(तेरा) "महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी सेवा" म्हणजे महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास व आरोग्य विभागाचा एक भाग म्हणून या प्रयोजनासाठी काम करणारी संघटना :

---

[1]. सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ६ द्वारे "पाणीपुरवठा व जलनिस्सारण मंडळ" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2]. महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण, भाग चार, दिनांक १६ जुलै १९९६ याद्वारे "सभापती" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[3]. सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २५ याच्या कलम ५ द्वारे "मंडळ" हा शब्द जेथे-जेथे आला असेल तेथे "प्राधिकरण" हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[1][ आणि त्यात पुढील प्रवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश होतो :—

(१) महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी सेवा, वर्ग एक आणि वर्ग दोन मधील सर्व अभियंते ;

(२) ज्यांची केवळ संघटनेच्या आस्थापनेवर नियुक्ती झालेली असेल आणि ज्यांचा महाराष्ट्र शासनाच्या अन्य कोणत्याही विभागातील कोणत्याही पदावर धारणाधिकार नसेल असे उपरोक्त (१) च्या कक्षेत न येणारे सर्व अधिकारी व कर्मचारी ;

(३) त्यावेळी संघटनेमध्ये सेवा करत असलेले महाराष्ट्र शासनाच्या पाटबंधारे विभागाच्या यंत्र अभियांत्रिकी संवर्गात असलेल्या तांत्रिक कर्मचारी वर्गातील सर्व अधिकारी व कर्मचारी;

(४) त्यावेळी संघटनेमध्ये सेवा करत असलेले पाटबंधारे विभागाच्या लिपिक व लिपिकेतर वर्गातील सर्व अधिकारी व कर्मचारी ;]

(चौदा) "मुख्य मार्ग" म्हणजे स्थानिक संस्थेने किंवा यथास्थिती [2][प्राधिकरणाने] व्यक्तिशः ग्राहकांना देण्यात येणाऱ्या पुरवठ्यापेक्षा वेगळा असा सर्वसाधारण पाणीपुरवठा देण्याच्या प्रयोजनासाठी घातलेला नळ आणि यात अशा नळाच्या संबंधात उपयोगात आणलेल्या कोणत्याही उपकरण संचाचा समावेश होतो.

(पंधरा) "सदस्य" म्हणजे "[2][प्राधिकरणाचा] सदस्य आणि यात "[2][प्राधिकरणाच्या] [3][अध्यक्ष, सह अध्यक्ष आणि] [4][उपाध्यक्ष यांचाही] समावेश होतो ;

(सोळा) "सदस्य-सचिव" म्हणजे "[2][प्राधिकरणाचा] सदस्य-सचिव ;

(सतरा) "अशासकीय सदस्य" म्हणजे जो पदसिद्ध सदस्य नाही असा सदस्य ;

(अठरा) कोणत्याही परिवास्तूच्या संबंधात "भोगवटादार" म्हणजे,—

(अ) त्या परिवास्तूच्या संबंधात त्यावेळी भाडे किंवा त्याचा कोणताही भाग मालकाकडे भरणारी किंवा भरण्यास पात्र असणारी कोणतीही व्यक्ती;

(ब) त्या परिवास्तूचा भोगवटा करणारा मालक;

(क) भाडे भरण्यापासून सूट देण्यात आलेला असा या परिवास्तूवरील भाडेकरी ;

(ड) त्या परिवास्तूचा भोगवटा करणारा लायसनधारक; आणि

(ई) त्या परिवास्तूचा वापर आणि भोगवटा यांच्या संबंधात मालकास भरपाई देण्यास पात्र असलेली कोणतीही व्यक्ती;

(एकोणीस) कोणत्याही परिवास्तूच्या संबंधात "मालक" म्हणजे जी उक्त परिवास्तूचे भाडे घेते किंवा परिवास्तू भाड्याने दिली तर तिचे भाडे घेण्याचा हक्क जिला असेल अशी व्यक्ती; आणि त्यामध्ये पुढील व्यक्तींचा समावेश आहे :—

(अ) मालकाच्या वतीने असे भाडे घेणारा एजंट किंवा विश्वस्त ;

---

[1] सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[2] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ५ द्वारे "मंडळ" हा शब्द जेथे जेथे आला असेल तेथे "प्राधिकरण" हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[3] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १८ याच्या कलम २ द्वारे "अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांचाही" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९९७ चा महाराष्ट्र अधि. क्र. २५ याच्या कलम ६(ब) द्वारे "अध्यक्ष आणि" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ब) धार्मिक किंवा धर्मादाय प्रयोजनांसाठीच असलेल्या कोणत्याही परिवास्तूचे भाडे घेणारा किंवा त्या परिवास्तूचे व्यवस्थापन ज्याच्याकडे सोपवले आहे असा एजंट किंवा विश्वस्त ;

(क) उक्त परिवास्तूचा प्रभार घेण्यासाठी किंवा तिच्या मालकीचे अधिकार वापरण्यासाठी सक्षम अधिकारिता असलेल्या कोणत्याही न्यायालयाने नेमलेला धारक (रिसीव्हर) किंवा व्यवस्थापक;

(ड) कब्जेगहाणदार ;

(वीस) "परिवास्तू" म्हणजे, कोणतीही जमीन किंवा इमारत किंवा इमारतीचा कोणताही भाग;

(एकवीस) "विहित" म्हणजे नियमांद्वारे विहित केलेले ;

(बावीस) कोणत्याही स्थानिक क्षेत्राच्या संबंधात "खाजगी रस्ता", "सार्वजनिक रस्ता" आणि "रस्ता" या शब्दांना, त्या स्थानिक क्षेत्रावर अधिकारिता असणाऱ्या स्थानिक संस्थेच्या संबंधातील कायद्यामध्ये त्यांना जो अर्थ नेमून देण्यात आला असेल तोच अर्थ असेल ;

(तेवीस) "विनियम" म्हणजे या अधिनियमाखाली केलेले विनियम ;

(चोवीस) "नियम" म्हणजे, या अधिनियमाखाली केलेले नियम ;

(पंचवीस) "सेवा नळ" (सर्व्हिस पाईप) म्हणजे, ज्याच्या सहाय्याने कोणत्याही परिवास्तूमध्ये पाणी पुरवण्यात येते असा, जोडणी नळाव्यतिरिक्तचा (कनेक्शन पाईपव्यतिरिक्तचा), स्टॉपकॉकच्या पलीकडील कोणताही नळ ;

(सव्वीस) "मलप्रवाह" (स्युएज) म्हणजे, विष्ठा आणि संडास, शौचकूप, पायखाना, मुत्र्या, मलकुंडे किंवा गटारे यांतील इतर पदार्थ आणि कुंड्या (सिंक्स), स्नानगृहे, तबेले आणि इतर तत्सम जागा यांमधून बाहेर पडणारे दूषित पाणी आणि यामध्ये धंद्यातील निःसृतांचा (ट्रेड एफ्ल्युएंटचा) समावेश आहे ;

(सत्तावीस) "मलप्रणाल" म्हणजे, मलप्रवाह, घाण पदार्थ, प्रदूषित पाणी, सांडपाणी किंवा भूपृष्ठाखालील पाणी (सबसॉईल वॉटर) वाहून नेण्यासाठी असलेले बंद प्रणाल (कॉंडूइट) ;

(अठ्ठावीस) "जलनिःसारण" म्हणजे एखाद्या क्षेत्रातील, त्यातील घरे, संस्था, उद्योग आणि सार्वजनिक जागा यांतील सांडपाणी एकत्र करणे, पंपाद्वारे त्याचे संस्करण करणे, असे सांडपाणी, त्याचे निःसृत, त्यातील गाळ (स्लज), गॅस आणि उत्पन्न होणारे इतर पदार्थ यांची विल्हेवाट लावणे यासाठी असलेली व्यवस्था;

(एकोणतीस) "स्टॉप कॉक" म्हणजे, कोणत्याही परिवास्तूचा पाणीपुरवठा बंद करण्यासाठी आणि त्याचे विनियमन करण्यासाठी मुख्य नळापासून निघालेल्या जोडणी नळाच्या शेवटी बसवलेला थोपनळ ;

(तीस) "धंद्यातील निःसृत" म्हणजे शेती आणि बागाईत यांसह कोणताही धंदा किंवा उद्योग चालवताना त्यातून पूर्णतः किंवा अंशतः निर्माण होणारा किंवा सोडण्यात येणारा व त्यात तरंगणारे पदार्थांचे कण असलेला किंवा तसे कण नसलेला कोणताही द्रवपदार्थ, परंतु त्यामध्ये घरगुती मलप्रवाहाचा समावेश होत नाही ;

(एकतीस) "पाण्याच्या जोडण्या" यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश आहे :—

(अ) कोणत्याही खाजगी मालमत्तेमध्ये असलेली व स्थानिक संस्थेच्या किंवा यथास्थिति मंडळाच्या मालकीच्या मुख्य नळ मार्गाला किंवा दुसऱ्या नळाला जोडलेली कोणतीही टाकी, हौद, नळखांब (हायड्रंट), उभा नळ (स्टँड पाईप), मीटर किंवा तोटी;

(ब) अशी टाकी, हौद, नळखांब, उभा नळ, मीटर किंवा तोटी ही अशा मुख्य नळ मार्गाला किंवा नळाला जोडणारा पाण्याचा नळ ;

(बत्तीस) "पाणीपुरवठा" म्हणजे एखाद्या क्षेत्राच्या, पिण्याच्या आणि इतर घरगुती वापर, उद्योग, करमणूक आणि विविध सार्वजनिक वापर यांच्या संबंधातील गरजा भागविण्यासाठी पाणी पुरविण्याची पद्धती;

(तेहतीस) "जलदाय व्यवस्था" यामध्ये, जलमार्ग (ओढा, तलाव, झरा, नदी किंवा कालवा, विहीर, जमिनीखालील पाण्याचे इतर मार्ग, पंप, पाझरपाट, जलाशय, हौद, टाकी यांसह), झाकलेली किंवा उघडी वाहिनी, संस्करण यंत्रसंच, जलद्वार, पुरवठ्याचा मुख्य मार्ग, अधःप्रणाल इंजिन, पाण्यासाठी असलेली मालमोटार, नळखांब, उभे नळ, प्रणाल आणि यंत्रसामग्री, जमीन, इमारत किंवा पाणी पुरवणाऱ्या किंवा पाणीपुरवठ्यासाठी किंवा पाणीपुरवठ्याच्या साधनांचे संरक्षण करण्यासाठी किंवा पाण्याच्या संस्करणासाठी वापरण्यात येणाऱ्या इतर गोष्टींत यांचा समावेश होतो;

## प्रकरण दोन

### [1][प्राधिकरणाची] स्थापना, त्याचे कामकाज चालवणे व त्याची कर्तव्ये आणि अधिकार

[1][प्राधिकरणाची] स्थापना.

३. (१) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर शक्य तितक्या लवकर राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्यात विनिर्दिष्ट करावयाच्या तारखेपासून या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी "महाराष्ट्र [2][जीवन प्राधिकरण]" या नावाच्या [1][प्राधिकरणाची] स्थापना करील.

(२) [1][प्राधिकरण] निगम निकाय असेल, त्याची परंपरा अखंड असेल व त्याचा सामाईक शिक्का असेल, आणि त्याला या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन, स्थावर आणि जंगम अशा दोन्ही मालमत्ता संपादन करण्याचा, धारण करण्याचा किंवा त्यांची विल्हेवाट लावण्याचा आणि करार करण्याचा अधिकार असेल व पूर्वोक्त निगम नावाने त्यास किंवा त्याच्यावर दावा लावता येईल.

१९०४ चा मुंबई, १. (३) [1][प्राधिकरण] हे, मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे स्थानिक प्राधिकरण असल्याचे मानण्यात येईल.

[1][प्राधिकरणाची] रचना.

१९९६ चा महा. १८. [3]["४. (१) महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळ (सुधारणा) व अधिनियम, १९९६ याच्या प्रारंभाच्या दिनांकास व त्या दिनांकापासून (यात यापुढे या कलमात ज्याचा निर्देश "प्रारंभाचा दिनांक" असा करण्यात आला आहे) विद्यमान सदस्यांच्या ऐवजी, [1][प्राधिकरण] पुढील सदस्यांचे मिळून होईल :—

| | | |
|---|---|---|
| (अ) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री | .. .. | पदसिद्ध अध्यक्ष; |
| [4][(अअ) नगरविकास मंत्री | .. .. | पदसिद्ध सहअध्यक्ष; |
| (बब) ग्रामविकास मंत्री | .. .. | पदसिद्ध सह अध्यक्ष]; |
| (ब) पाणीपुरवठा राज्यमंत्री | .. .. | पदसिद्ध उपाध्यक्ष; |
| (क) नगरविकास राज्यमंत्री | .. .. | पदसिद्ध उपाध्यक्ष; |

---

[1]. सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २५ याच्या कलम ५ द्वारे "मंडळ" हा शब्द जेथे जेथे आला आहे, तेथे तेथे "प्राधिकरण" हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला आहे.

[2]. वरील अधिनियमाच्या कलम ७ द्वारे "पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळ" या मजकुराऐवजी "जीवन प्राधिकरण" हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3]. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १८ कलम ३ द्वारे मूळ कलम ४ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[4]. वरील अधिनियमाच्या कलम ८(अ) (एक) द्वारे "खंड (अ)" ऐवजी हे खंड दाखल करण्यात आले.

(ड) पुढील विभागाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी राज्य शासनाने नियुक्त करावयाचे शासनाच्या व सचिव पदाच्या दर्जापेक्षा खालच्या दर्जाचे नसलेले, सहा शासकीय सदस्य :—

(एक) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग;

(दोन) नगरविकास विभाग;

(तीन) ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग;

(चार) वित्त विभाग;

(पाच) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, आणि

(सहा) सार्वजनिक आरोग्य विभाग;

(ई) पुढीलपैकी प्रत्येकी एक, याप्रमाणे राज्य शासनाने नियुक्त करावयाचे दोन सदस्य :—

(एक) महानगरपालिकेचे महापौर आणि नगरपरिषदांचे अध्यक्ष ; आणि

(दोन) जिल्हा परिषदांचे अध्यक्ष;

(फ) राज्य शासनाच्या मते ज्यांना पाणीपुरवठा किंवा जलनि:स्सारण या क्षेत्रातील विशेष ज्ञान किंवा प्रत्यक्ष अनुभव आहे असे, राज्य शासनाने नियुक्त करावयाचे [1][ सहा सदस्य] ; आणि

(ग) राज्य शासनाने नियुक्त करावयाचा सदस्य-सचिव.

(२) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, प्रारंभाच्या दिनांकापासून पोट-कलम (१) च्या खंड [2][(अ), (अअ) (बब), (ब)] (क), (ड) आणि (ग) मध्ये विनिर्दिष्ट केलेली पदे त्या त्या वेळी धारण करीत असतील असे सदस्य कोणत्याही वेळी मंडळाचे सर्व अधिकार वापरतील, व कर्तव्ये आणि कामे पार पाडतील, आणि त्या त्या वेळी इतर सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही सदस्यांची नियुक्ती झाली नसली तरीही मंडळाची वैधरीत्या रचना झाली असल्याचे मानण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) च्या खंड (ड), ई, व (फ) अन्वये सदस्य म्हणून नियुक्त केलेल्या व्यक्तींची नावे, वेळोवेळी राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येतील ].

**अशासकीय सदस्य होण्यासाठी अनर्हता.**

५. एखादी व्यक्ती,—

(अ) नैतिक अधोगतीचा अंतर्भाव होणाऱ्या कोणत्याही अपराधाबद्दल सिद्धदोष ठरली असेल ;

(ब) अमुक्त नादार असेल ;

(क) विकल मनाची असेल व सक्षम न्यायालयांकडून ती तशी असल्याचे जाहीर करण्यात आले असेल ;

(ड) कलमे ६ व ७ यामध्ये तरतूद केली असेल ते खेरीज करून [3][प्राधिकरणामध्ये] कोणतेही लाभदायक पद धारण करीत असेल ;

(ई) [3][प्राधिकरणाबरोबर] किंवा त्याच्याद्वारे किंवा त्याच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेत किंवा नोकरीमध्ये तिचा स्वत:चा किंवा कोणताही भागीदार, नियोक्ता किंवा कर्मचारी यांच्यामार्फत धनविषयक किंवा इतर कोणत्याही स्वरूपाचा हिस्सा किंवा हितसंबंध प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे असेल ; किंवा

---

[1]. सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २५ कलम ८(अ) (दोन) द्वारे "चार सदस्य" या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2]. वरील अधिनियमाच्या कलम ८(ब) द्वारे खंड "(अ), (ब)" या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3]. सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ५ द्वारे "मंडळ" या मजकुराऐवजी "हा" मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारासह दाखल करण्यात आला.

(फ) [१][प्राधिकरणाबरोबर] किंवा त्याच्याद्वारे किंवा त्याच्या वतीने केलेल्या एखाद्या संविदेत किंवा नोकरीत जिचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल अशा कोणत्याही कंपनीचा संचालक, सचिव, व्यवस्थापक किंवा इतर अधिकारी असेल; तर ती, अशासकीय सदस्य म्हणून नियुक्त केली जाण्यास किंवा अशासकीय सदस्य म्हणून पदावर राहण्यास अनर्ह असेल ;

परंतु, जर एखाद्या व्यक्तीचा किंवा ती व्यक्ती ज्या कंपनीची संचालक, सचिव, व्यवस्थापक किंवा इतर अधिकारी असेल त्या कंपनीचा,—

(एक) एखाद्या स्थावर मालमत्तेच्या कोणत्याही विक्रीत, खरेदीत, भाडेपट्टचात किंवा विनियमात किंवा त्यासाठी केलेल्या कोणत्याही करारात ;

(दोन) पैसे कर्जाऊ देण्यासाठी केलेल्या कोणत्याही करारनाम्यात किंवा फक्त पैसे देण्यासाठी द्यावयाच्या कोणत्याही तारणात;

(तीन) [१][प्राधिकरणाशी] संबंधित कामकाजाची कोणतीही जाहिरात ज्यामध्ये प्रसिद्ध केली असेल अशा कोणत्याही वर्तमानपत्रात;

(चार) ती स्वत: किंवा कंपनी ज्याचा नियमितपणे व्यापार करीत असेल अशा कोणत्याही वस्तूच्या, एका वर्षात दहा हजार रुपयांपेक्षा मूल्यात अधिक नसणाऱ्या [१][प्राधिकरणाला] केलेल्या प्रासंगिक विक्रीत;

कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध आहे एवढ्याच केवळ कारणावरून कोणत्याही व्यक्तीस खंड (ई) किंवा खंड (फ) खाली अनर्ह ठरविण्यात येणार नाही.

सदस्यांचा पदावधी. [२]६. (१) कलम ४, पोट-कलम (१) च्या [३][खंड (ई) किंवा (फ)] अन्वये सदस्य म्हणून नेमलेली व्यक्ती, राज्य शासनाने, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, तिचा पदावधी पूर्वीच समाप्त केला नसेल तर, तिच्या नेमणुकीच्या तारखेपासून तीन वर्षांकरिता पद धारण करील.

[४]*      *      *      *      *      *      *

(३) सदस्य-सचिव हा राज्य शासन आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा मुदतीपर्यंत पद धारण करील.

(४) सदस्य पुनर्नियुक्तीकरिता पात्र असतील.

(५) कोणत्याही सदस्याला कोणत्याही वेळी, राज्य शासनाला उद्देशून स्वत:च्या सहीने, आपल्या पदाचा लेखी राजीनामा देता येईल आणि असा राजीनामा मंजूर झाल्यानंतर त्याने आपले पद रिकामे केल्याचे मानण्यात येईल].

सदस्यांची तात्पुरती अनुपस्थिती. [५]६अ. [६][(१) अध्यक्षांच्या अनुपस्थितीमध्ये, सह-अध्यक्ष असलेला, नगरविकास मंत्री आणि त्या दोघांच्याही अनुपस्थितीमध्ये दुसरा सह अध्यक्ष असलेला ग्रामविकास मंत्री आणि सर्व उक्त तिघांच्याही अनुपस्थितीमध्ये, उपाध्यक्ष असलेला पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री, आणि त्याच्या

[१] सन १९९७ चा महा. अधि. क्र. २५ याच्या कलम ५ द्वारे "मंडळ" या मजकुराऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारासह दाखल करण्यात आला.

[२] सन १९८३ चा महा. अधि. क्र. ३ याच्या कलम ४ द्वारे मूळ कलम ६ ऐवजी कलमे ६ व ६ अ दाखल करण्यात आली.

[३] सन १९९६ चा महा. अधि. क्र. १८ याच्या कलम ४ (अ) द्वारे "खंड (क), (ड) किंवा (फ)" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ४(ब) द्वारे पोट-कलम (२) वगळण्यात आले.

[५] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १८ याच्या कलम ५ द्वारे मूळ कलम ६अ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[६] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २५ याच्या कलम ९ द्वारे कलम ६अ चे पोट-कलम (१) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

(शा.म.मु.) व्हीए ४३८४—३ (६,२३९–८–९८)

अनुपस्थितीमध्ये दुसरा उपाध्यक्ष असलेला नसलेल्या काळात राहणारी, अध्यक्षांची कर्तव्ये पार पाडण्यास व त्याची कामे करण्यास सक्षम असेल.]

(२) [१][प्राधिकरणाच्या] पदसिद्ध सदस्यांव्यतिरिक्त [१][प्राधिकरणाचा] कोणताही इतर सदस्य आजारपणामुळे किंवा अन्यथा आपली कर्तव्ये पार पाडण्यास तात्पुरता असमर्थ झाला असेल किंवा त्याला राज्य शासनाने अनुपस्थितीत राहण्यास परवानगी दिलेली असेल किंवा आपली कर्तव्ये पार पाडण्यास अन्यथा असमर्थ असेल परंतु, त्याचे सदस्यत्व बंद झाले नसेल, अशा परि-स्थितीत राज्य शासनाला, या अधिनियमाद्वारे किंवा तद्अन्वये सोपविण्यात आलेली त्याची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी सदस्य म्हणून त्याच्याऐवजी काम पाहण्यासाठी अन्य व्यक्तीची नियुक्ती करता येईल. अशी व्यक्ती, तो सदस्य ज्या दिनांकाला आपल्या कामावर रूजू होईल त्या दिनांकाला पद रिकामे करील.]

सदस्यां-विषयीच्या इतर तरतुदी.

७. (१) [२][ * * * ] सदस्य-सचिवाला [१][प्राधिकरणाच्या] निधीतून, राज्य शासन निश्चित करील असे वेतन व भत्ते देण्यात येतील ;

(२) [१][प्राधिकरणाच्या] इतर सदस्यांना, राज्य शासन निश्चित करील असे भत्ते देण्यात येतील ;

[३]* * * * * *

प्राधि-करणाचे अधिकारी व कर्मचारी आणि त्यांचा सेवाप्रवेश व सेवेच्या शर्ती.

८. (१) आपली कर्तव्ये कार्यक्षम रीतीने पार पाडण्यासाठी आणि आपली कार्ये पार पाडण्यासाठी [१][प्राधिकरणास] आवश्यक वाटतील अशा अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची नियुक्ती, त्याला राज्य शासनाने मंजूर केलेल्या पदावर करता येईल. [१][प्राधिकरणाचे] अधिकारी व कर्मचारी यांचा सेवाप्रवेश व सेवेच्या शर्ती विनियमांद्वारे निर्धारित करण्यात येतील.

[४][(१अ) (एक) पोट-कलम (१) मधील तरतुदींच्या अधीन राहून कोणत्याही व्यक्तीची, भारताच्या संविधानाअन्वये महाराष्ट्र राज्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाशी (यात यापुढे ज्याचा "आयोग" असा निर्देश करण्यात आला आहे) विचारविनियम केल्याशिवाय अभियंता, श्रेणी एक आणि श्रेणी दोन या पदांवर नियुक्ती केली जाणार नाही.

(दोन) प्राधिकरण आणि आयोग यांच्याशी विचारविनियम केल्यावर राज्य शासन पुढील गोष्टी विहित करणारे नियम करील,—

(अ) पदांची जाहिरात देणे, अर्ज मागवणे, त्यांची छाननी करणे आणि मुलाखतीसाठी उमेदवारांची निवड करणे याबाबतीत आयोगाने अनुसरावयाची कार्यपद्धती;

(ब) आयोगाला सल्ला देण्यासाठी मुलाखतीच्या वेळी प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यास किंवा अधिकाऱ्यांना उपस्थित राहाणे शक्य करणारी कार्यपद्धती;

(क) प्राधिकरण व आयोग्य यांच्यामध्ये मतभिन्नता आढळेल अशा बाबतीत अनुसरावयाची कार्यपद्धती;

(ड) सल्ला आणि इतर आनुषंगिक बाबी यासाठी प्राधिकरणाकडून आयोगास देण्यात यावयाची फी व इतर खर्च ;

---

[१].सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम, क्र. २५ यांच्या कलम ५ द्वारे "मंडळ" या मजकुराऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[२].सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३ याच्या कलम ५(अ) द्वारे "सभापती व" हा मजकूर वगळण्यात आला.

[३].सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३ याच्या कलम ५(ब) द्वारे पोट-कलम (३) वगळण्यात आले.

[४].सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २५ याच्या कलम १० द्वारे ही पोट-कलमे जादा दाखल करण्यात आली.

(ई) आयोगाशी सल्लामसलत करण्याच्या प्रयोजनाकरिता आवश्यक किंवा आनुषंगिक असणारी कोणतीही अन्य बाब ;

(१ ब) या कलमान्वये आयोगाकडे भरलेली सर्व फी राज्य शासनाकडे जमा करण्यात येईल.]

(२) समुचित शासनाच्या पूर्व मान्यतेने [1][प्राधिकरणास], त्याला योग्य वाटतील अशा अटी व शर्तींवर केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या एखाद्या कर्मचाऱ्यास [1][प्राधिकरणाचा] कर्मचारी म्हणून नियुक्त करता येईल.

(३) [1][प्राधिकरणाच्या] अधीक्षणांच्या अधीन, सदस्य-सचिव हा [1][प्राधिकरणाचा] मुख्य कार्यकारी अधिकारी असेल, तो [1][प्राधिकरणामध्ये] प्रतिनियुक्तीतीवर नियुक्त केलेल्या शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्यासह, [1][प्राधिकरणाचे] सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्यावर पर्यवेक्षण व नियंत्रण ठेवील.

[1][प्राधिकरणाचे] आदेश इत्यादींचे अधिप्रमाणन.

९. [1][प्राधिकरणाच्या] सर्व कार्यवाहयांचे अधिप्रमाणन अध्यक्ष किंवा अध्यक्षाने प्राधिकृत केलेल्या सदस्यांच्या सहीने करण्यात येईल आणि [1][प्राधिकरणाचे] इतर सर्व आदेश व लेख यांचे अधिप्रमाणन सदस्य-सचिवांच्या किंवा याबाबतीत विनियमांद्वारे प्राधिकृत करण्यात येईल अशा इतर कोणत्याही अधिकाऱ्याच्या सहीने करण्यात येईल.

शासनाचे अधिकारी, इत्यादींचे सहाय्य.

१०. [1][प्राधिकरणास], एखाद्या बाबीवर त्याला सल्ला देण्यासाठी किंवा सहाय्य करण्यासाठी शासनाच्या किंवा एखाद्या स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा इतर व्यक्तीस आपल्या बैठकीत उपस्थित राहण्यासाठी निमंत्रित करता येईल. अशा प्रकारे निमंत्रित केलेल्या व्यक्तीत [1][प्राधिकरणाच्या] कार्यवाहीत भाग घेता येईल परंतु तिला मतदानाचा अधिकार असणार नाही.

अधिकारांचे प्रत्यायोजन.

११. या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन राहून, [1][प्राधिकरणाला] सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे त्याने नेमलेल्या एखाद्या समितीला किंवा अध्यक्षाला किंवा सदस्य-सचिवाला किंवा [1][प्राधिकरणाच्या] इतर कोणत्याही अधिकाऱ्याला, एकतर विनाशर्त किंवा स्वत : फेरतपासणी करण्याच्या शर्तीसह त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तीस अधीन राहून, [1][प्राधिकरणास] योग्य वाटतील असे त्याचे या अधिनियमाखालील अधिकार, कर्तव्ये व कार्ये प्रत्यायोजित करता येतील, मात्र असे अधिकार, कर्तव्ये व कार्ये ही कलमे ३४, ६६ व ६७ याखालील अधिकार, कर्तव्ये व कार्ये असणार नाहीत.

हितसंबंधामुळे [1][प्राधिकरणाच्या] किंवा समितीच्या कार्यवाहीत भाग घेण्याबाबत अनर्हता.

१२. (१) (अ) कोणत्याही बाबतीत ज्याचा कलम ५ च्या खंड (ई) किंवा खंड (फ) मध्ये वर्णन केलेल्या स्वरूपाचा हिस्सा किंवा हितसंबंध असेल असा, किंवा

(ब) त्याबाबतीत जिचा पूर्वोक्तप्रमाणे असा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल अशा कोणत्याही व्यक्तीच्या वतीने ज्याने कोणत्याही बाबीच्या संबंधात व्यावसायिक दृष्टीने कृती केली असेल असा,

[1][प्राधिकरणाचा], किंवा [1][प्राधिकरणाने] नियुक्ती केलेल्या एखाद्या समितीचा कोणताही सदस्य हा, कलम ५ च्या परंतुकात काहीही अंतर्भूत असले तरी, अशा बाबींच्या संबंधात [1][प्राधिकरणाच्या] किंवा त्याच्या समितीच्या कोणत्याही कार्यवाहीत (कोणत्याही ठरावावरील किंवा प्रश्नांवरील कोणत्याही चर्चेसह) मत देणार नाही किंवा भाग घेणार नाही.

(२) या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनासाठी या क्षेत्रातील जमीन संपादन करण्याचे योजले असून अशा कोणत्याही क्षेत्रात [1][प्राधिकरणाच्या] किंवा [1][प्राधिकरणाने] नेमलेल्या एखाद्या

---

१. सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ५ द्वारे "मंडळ" या शब्दाऐवजी हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

समितीच्या सदस्याचा कोणताही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हितसंबंध असेल तर तो [१][प्राधिकरणाच्या] किंवा त्याच्या समितीच्या ज्या बैठकीत अशा जमिनीशी संबंधित कोणत्याही बाबींवर विचार करण्यात येणार असेल अशा कोणत्याही बैठकीत भाग घेणार नाही.

(३) पोट-कलम (१) किंवा (२) यामधील कोणत्याही गोष्टींवर, या पोट-कलमात निर्दिष्ट केलेल्या विषयांखेरीज इतर कोणत्याही विषयाशी संबंधित कोणत्याही ठरावावर किंवा प्रश्नावर मत देण्यास किंवा चर्चेत भाग घेण्यास [१][प्राधिकरणाच्या] किंवा त्याच्या एखाद्या समितीच्या कोणत्याही सदस्यास प्रतिबंध होणार नाही.

**रिक्त पद, अनौपचारिकता इत्यादींमुळे कृती विधि-अग्राह्य न होणे.**

१३. [१][प्राधिकरणाने] किंवा [१][प्राधिकरणाने] नेमलेल्या एखादया समितीने अधिनियमाखाली केलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही केवळ पुढील कारणामुळे विधिअग्राह्य ठरविण्यात येणार नाही:—

(अ) एखाद्या सदस्याचे पद रिक्त असणे किंवा [१][प्राधिकरणाच्या] किंवा त्याच्या एखाद्या समितीच्या रचनेत किंवा फेररचनेत कोणताही दोष असणे, किंवा

(ब) [१][प्राधिकरणाचा] किंवा त्याच्या एखाद्या समितीचा सदस्य म्हणून एखाद्या व्यक्तीच्या नेमणुकीत कोणताही दोष किंवा नियमबाह्य गोष्ट असणे,

(क) अशा कृतीत किंवा कार्यवाहीत सारतः परिणाम न करणारा कोणताही दोष किंवा नियमबाह्य गोष्ट असणे.

**[१][प्राधिकरणाची] कर्तव्ये व कार्ये.**

१४. [१][प्राधिकरणाची] कर्तव्ये व कार्ये पुढीलप्रमाणे असतील :—

(अ) पाणीपुरवठ्याच्या आणि जलनिस्सारण व मलप्रवाह विल्हेवाट यांच्या योजना तयार करणे, त्यांची अंमलबजावणी करणे, त्यांना चालना देणे व त्यांच्यासाठी वित्त व्यवस्था करणे;

(ब) राज्य शासन व स्थानिक संस्था यांना व विनंती केल्यास खाजगी संस्था व व्यक्ती यांनादेखील पाणीपुरवठा व जलनिस्सारण यांच्या संबंधात सर्व आवश्यक सेवा पुरविणे.

(क) राज्य शासनाच्या निर्देशाप्रमाणे पाणीपुरवठा, जलनिस्सारण व गटार व्यवस्था यासाठी राज्य योजनांचा मसुदा तयार करणे;

(ड) [१][प्राधिकरणाच्या] व ज्यांनी [१][प्राधिकरणाशी] करार केला आहे अशा स्थानिक संस्थांच्या क्षेत्रातील पाणीपुरवठा व जलनिस्सारण, त्याचे प्रशुल्क, कर, फी व आकार यांचा आढावा घेऊन त्यावर सल्ला देणे;

(ई) साधनसामग्रीच्या आवश्यकतांचा अंदाज करणे व त्यांच्या प्रापणाची व वापराची व्यवस्था करणे;

(फ) पाणीपुरवठा व जलनिस्सारण सेवा यांच्यासाठी राज्य मानके स्थापन करणे;

(ग) [१][प्राधिकरणाच्या] किंवा ज्यांनी [१][प्राधिकरणाशी] करार केला आहे अशा स्थानिक संस्थांच्या पाणीपुरवठ्याच्या व जलनिस्सारणाच्या तांत्रिक, वित्तीय, आर्थिक व इतर बाजूंचा वार्षिक आढावा घेणे;

(ह) राज्यातील प्रत्येक पाणीपुरवठ्याच्या व जलनिस्सारणाच्या तांत्रिक, वित्तीय, आर्थिक व इतर समयोचित बाजूंचा आढावा घेण्यासाठी व त्यांचे मूल्यांकन करण्यासाठी सोय सुरू करणे व ती चालू ठेवणे;

(आय) राज्य शासनाकडून निदेश देण्यात आल्यास व निदेश देण्यात येईल तेव्हा, राज्य शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अटींवर व शर्तींवर आणि अशा मुदतीकरिता कोणत्याही जलदाय व्यवस्था व जलनिस्सारण प्रवर्तित करणे, चालविणे व त्याचे परिरक्षण करणे;

(जे) राज्यातील पाणीपुरवठा व जलनिस्सारण, सेवा यांच्या संबंधातील मनुष्यबळ व प्रशिक्षण यांची किती आवश्यकता आहे, याचा अंदाज घेणे ;

---

[१] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २५ याच्या कलम ५ द्वारे "मंडळ" या शब्दाऐवजी हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

(के) [1][प्राधिकरणाची] कर्तव्ये व कार्ये कार्यक्षमरित्या पार पाडता येण्यासाठी उपयोजित संशोधन करणे;

(ल) राज्य शासनाकडून, वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी सेवा, यांच्याकडून पार पाडण्यात येत असतील अशी कर्तव्ये व कार्ये पार पाडणे;

(म) या अधिनियमाच्या इतर तरतुदीन्वये [1][प्राधिकरणाला] नेमून दिली असतील अशी किंवा राज्य शासनाकडून त्याच्याकडे सोपविण्यात येतील अशी इतर कर्तव्ये पार पाडणे व कार्ये करणे.

[1][प्राधिकरणा-चे] अधिकार.

१५. (१) या अधिनियमाच्या इतर तरतुदींस अधीन राहून [1][प्राधिकरणास] या अधिनियमाखालील त्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी व कार्ये करण्यासाठी आवश्यक किंवा इष्ट असेल अशी कोणतीही गोष्ट करण्याचा अधिकार असेल.

(२) पूर्ववर्ती तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध न येऊ देता, अशा अधिकारामध्ये :—

(अ) राज्यातील पाणीपुरवठा व जलनिस्सारण यांच्या सर्व सोयींची—मग त्या कोणाकडूनही चालवण्यात येत असोत-तपासणी करणे;

(ब) कोणतीही स्थानिक संस्था व चालक अभिकरण (ऑपरेटिंग एजन्सी) यांच्याकडून [1][प्राधिकरणास] आवश्यक वाटेल अशी नियतकालिक किंवा विनिर्दिष्ट माहिती मिळविणे;

(क) त्याच्या स्वतःच्या कर्मचारीवर्गासाठी, तसेच स्थानिक संस्थांच्या कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षणाची तरतूद करणे;

(ड) पाणीपुरवठा व जलनिःस्सारण यांच्यासाठी योजना तयार करून त्या पार पाडणे ;

(ई) [1][प्राधिकरणाकडून] राज्य शासन, स्थानिक संस्था, परिसंस्था किंवा व्यक्ती यांना दिलेल्या सर्व तऱ्हेच्या सेवांसाठी फी व इतर आकार यांची अनुसूची ठरवून देणे;

(फ) या अधिनियमाखालील, आपली कर्तव्ये पार पाडण्यासाठी व कार्ये करण्यासाठी [1][प्राधिकरणास] आवश्यक वाटेल त्याप्रमाणे, कोणत्याही व्यक्तीशी किंवा व्यक्तींशी संविदा किंवा करार करणे ;

(ग) दरवर्षी स्वतःचा अर्थसंकल्प अंगीकारणे ;

(ह) [1][प्राधिकरणाच्या] आणि ज्यांनी [1][प्राधिकरणाशी] करार केला आहे, अशा स्थानिक संस्थांच्या अधिकारितेत येणाऱ्या संबंधित स्थानिक क्षेत्रांना लागू असणाऱ्या पाणीपुरवठ्यासाठी व जलनिःस्सारण सेवांसाठी असलेले प्रशुल्क मान्य करणे ;

(आय) आपल्या अधिकारितेतील क्षेत्रातील लोकांसाठी आरोग्यप्रद पाण्याची व जेथे शक्य असेल तेथे कार्यक्षम जलनिःस्सारण सेवेची तरतूद करता येईल अशा प्रकारे आपल्या सर्व कामांचे व्यवस्थापन करणे ;

(ज) कोणत्याही आणीबाणीच्या वेळी पाणीपुरवठ्याची सुनिश्चिती करण्यासाठी, आवश्यक अशा इतर उपाययोजना करणे ;

(के) **जमीन** व इतर मालमत्ता संपादन करणे, त्यांचा कब्जा घेणे व त्या धारण करणे आणि कोणताही महामार्ग, रस्ता किंवा जागा यांमधून, त्यांना आडवा छेद देऊन त्यावरून किंवा त्याखाली किंवा मालकास किंवा भोगवटादारास वाजवी लेखी नोटीस दिल्यानंतर कोणतीही इमारत किंवा जमीन यात त्यामधून, त्यावरून किंवा त्याखालून जलप्रदाय व्यवस्थाविषयक व जलनिःसारणविषयक कामे पार पाडणे ;

(ल) कोणत्याही नैसर्गिक मार्गातून पाणी काढणे व त्याच्या पाण्याची विल्हेवाट लावणे ;

---

[1] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ५ अन्वये "मंडळ" या शब्दाऐवजी हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

(म) पिण्याच्या पाण्याच्या पुरवठा योजना व जलनिःस्सारण योजना यासाठी किंवा स्वच्छतेत सुधारणा करण्याच्या अन्य कोणत्याही योजनांसाठी इष्ट असतील अशा अटींवर व शर्तींवर आणि विशेषतः कर्जे व आगाऊ रकमा, ठेवी व ऋणपत्रांची विक्री या मार्गे पैसा उभारणे, कर्जाऊ घेणे किंवा मिळविणे व भारतीय आयुर्विमा महामंडळ, बँका व कोणत्याही आंतरराष्ट्रीय संघटना यासारख्या सार्वजनिक परिसंस्थांकडून किंवा व केंद्र शासनाकडून अर्थसहाय्य किंवा गहाण ऋण मिळविणे ;

(न) पाणीपुरवठा व जलनिःसारण योजना किंवा इतर कोणत्याही स्वच्छता सुधारणा योजना यासाठी राज्य शासन, केंद्र शासन व स्थानिक संस्था यांच्याकडून अनुदाने स्वीकारणे ;

(ओ) आपसात कबूल करण्यात आल्या असतील अशा अटी व शर्तीनुसार कर्जे देणाऱ्यांना कर्जाचे हप्ते परत करणे व त्यांच्या मुद्दलावर व्याज देणे ;

(पी) [1][प्राधिकरणाकडून] विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अटी व शर्तींवर स्थानिक संस्थांना किंवा शासनाला त्यांच्या पाणीपुरवठा व जलनिःस्सारण योजनांसाठी कर्जे देणे ;

(क्यू) स्थानिक संस्था किंवा शासन यांच्याकडून त्यांना [1][प्राधिकरणाकडून] देण्यात आलेल्या कर्जाच्या संबंधातील मुद्दल व त्यावरील व्याज वसूल करणे ;

(र) या अधिनियमाखाली आपली कर्तव्ये पार पाडण्यास व कार्ये करण्यास [1][प्राधिकरणास] आवश्यक वाटेल असा खर्च करणे ;

(स) या अधिनियमाच्या इतर तरतुदींअन्वये [1][प्राधिकरणास] प्रदान करण्यात आले असतील अशा इतर अधिकारांचा वापर करणे ;

निदेश देण्याचे व विवरणे, अहवाल इत्यादी मागविण्याचे [1][प्राधिकरणाचे] अधिकार.

१६. (१) त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी मंडळास, त्यांच्याकडून कलम १४, खंड (अ) अन्वये वित्तसहाय्य देण्यात आलेल्या कोणत्याही पाणीपुरवठा किंवा जलनिःस्सारण योजनेच्या अंमलबजावणीच्या संबंधात, कोणत्याही स्थानिक संस्थेस त्यास योग्य वाटतील असे निदेश देता येतील व अशा निदेशाचे अनुपालन करणे हे अशा संस्थांवर बंधनकारक असेल.

(२) अशा कोणत्याही निदेशामुळे कोणत्याही स्थानिक संस्थेला तिच्यावर अन्याय झाला असे वाटले असेल किंवा त्या निदेशांचे अनुपालन करण्यात तिला कोणतीही अडचण अनुभवास येत असेल अशा प्रकरणी ती अशी बाब राज्य शासनाकडे पाठवील व त्यावरील राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल.

(३) [1][प्राधिकरणास] या अधिनियमाखालील स्वतःच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व कर्तव्ये पार पाडण्यासाठी व कार्ये करण्यासाठी त्याला आवश्यक असेल असे कोणतेही विवरण, लेखा विवरणपत्र, अहवाल आकडेवारी किंवा इतर माहिती, कोणत्याही स्थानिक संस्था किंवा इतर संस्था किंवा व्यक्ती यांच्याकडून मागविण्याचा अधिकार असेल आणि अशी माहिती पुरविणे हे अशा संस्थेवर किंवा व्यक्तींवर बंधनकारक असेल.

पर्यवेक्षण व टक्केवारी खर्च.

१७. [1][प्राधिकरणास] कलम १४, खंड (अ) अन्वये जिची अंमलबजावणी किंवा पुढील अंमलबजावणी हाती घेण्यात आली आहे. अशा कोणत्याही योजनेच्या किंवा बांधकामाच्या खर्चात, कलम १५, पोट-कलम (२) च्या खंड (ई) अन्वये ते निश्चित करील असा, विहित करण्यात येईल त्या मर्यादेपेक्षा अधिक होणार नाही अशा दराने पर्यवेक्षण व टक्केवारी खर्च अंतर्भूत करता येईल.

---

[1]सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम, २५ याच्या कलम ५ द्वारे "मंडळ" या शब्दाऐवजी हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

## प्रकरण तीन

### मालमत्ता, मत्ता, दायित्वे आणि बोजे निहित करणे आणि कर्मचाऱ्यांची बदली

मालमत्ता [1][प्राधिकरणाकडे] निहित करणे व तिचे [1][प्राधिकरणाकडे] हस्तांतरण करणे.

१८. (१) राज्य शासनास, वेळोवेळी, विहित करता येतील अशा निरनिराळ्या दिनांकांपासून (या कलमात यापुढे ज्याचा "नियत दिनांक" असा निर्देश करण्यात आला आहे),—

(अ) नियत दिनांकाच्या लगतपूर्वी महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी सेवेच्या प्रयोजनासाठी ज्या राज्य शासनाकडे निहित होत्या अशा त्याबाबतीत विहित केलेल्या (जलदाय विषयक बांधकामे इमारती, प्रयोगशाळा, भांडारे, वाहने, फर्निचर्स आणि इतर फर्निशिंग यांसह) मालमत्ता आणि मत्ता [1][प्राधिकरणाकडे] निहित होतील आणि हस्तांतरित करण्यात येतील ; आणि

(ब) राज्य शासनाचे कोणत्याही करारान्वये किंवा, अन्य रीतीने उद्‌भवणारे उक्त सेवेशी संबंधित असलेले अधिकार, दायित्वे, आणि बोजे हे [1][प्राधिकरणाचे] अधिकार. दायित्वे, आणि बोजे असतील.

(२) अशा मालमत्ता, मत्ता, अधिकार, दायित्वे आणि बोजे यांचे राज्य शासन ठरवील अशा रीतीने मूल्यांकन करण्यात येईल.

(३) वर नमूद केलेल्या बाबींशी संबंधित असलेले नियत दिनांकापूर्वी राज्य शासनाने दाखल केलेले किंवा त्यांच्याकडून दाखल करण्यात येणारे किंवा त्यांच्याकडून किंवा त्या विरुद्ध प्रतिवाद केले गेलेले सर्व दावे आणि इतर वैध कार्यवाही [1][प्राधिकरणाकडून] चालू ठेवण्यात येईल किंवा दाखल करण्यात येईल किंवा [1][प्राधिकरणातर्फे] [1][प्राधिकरणाविरुद्ध] प्रतिवाद करण्यात येईल.

मालमत्ता निहित करण्याबाबत राज्य शासनाचा निर्णय अंतिम असणे.

१९. कलम १८ अन्वये कोणतीही मालमत्ता किंवा मत्ता [1][प्राधिकरणाकडे] निहित झाली आहे. किंवा कोणतेही अधिकार, दायित्वे आणि बोजे हे त्या कलमान्वये, [1][प्राधिकरणाचे] अधिकार, दायित्वे आणि बोजे झाले आहेत किंवा कसे याबद्दल कोणतीही शंका किंवा वाद उद्‌भवल्यास ती राज्य शासनाकडे निर्देशित करण्यात येईल आणि त्याचा निर्णय अंतिम असेल.

विद्यमान पाणीपुरवठा आणि जलःनिःसारण सेवा [1][प्राधिकरणाकडे] निहित असणे.

२०. (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, [1][प्राधिकरणास] कोणत्याही वेळी राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने, सुव्यवस्थेसाठी किंवा आवर्धनासाठी किंवा सुधारणेसाठी कोणत्याही स्थानिक संस्थेकडून कोणतीही पाणीपुरवठा आणि जलनिःस्सारण सेवा ताब्यात घेता येईल, आणि अशा प्रकरणाने,—

(अ) यथास्थिति सर्व यंत्रे यंत्रणा, जलदाय व्यवस्था, पंप केंद्रे, गाळणी संस्तर, पाण्याचे मुख्य नळ मार्ग आणि कोणत्याही सार्वजनिक रस्त्यांमध्ये, त्यास समांतर, त्याच्यावर किंवा त्याखाली असणारे सार्वजनिक मलप्रणाल हे धरून सर्व विद्यमान पाणीपुरवठा आणि जलनिःसारण सेवा मलप्रवाहविषयक बांधकामे आणि मलप्रवाह प्रक्षेत्रे आणि त्या स्थानिक संस्थाच्या मालकीच्या किंवा त्यांच्याकडे निहित असलेल्या सर्व इमारती, जमिनी आणि इतर बांधकामे, साधनसामग्री भांडारे आणि त्याच्याशी संबंधित गोष्टी;

(ब) वाढवणे, खोल करणे किंवा अन्य प्रकारे दुरुस्ती करणे किंवा सुस्थितीत ठेवणे या प्रयोजनासाठी आवश्यक असेल त्या मर्यादेपर्यंत उक्त पाण्याचे मुख्य नळ मार्ग आणि मलप्रणाल यांच्यांशी संबद्ध असलेली भूपृष्ठाखालील जमीन किंवा असे पाण्याचे मुख्य नळ मार्ग आणि मलप्रणाल किंवा कोणतेही नळ आणि अशा पाणीपुरवठ्याशी आणि जलनिःसारण सेवेशी आणि

---

[1]सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ५ द्वारे "मंडळ" या शब्दांऐवजी हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारासह दाखल करण्यात आला.

मलप्रवाहविषयक बांधकामाशी आणि मलप्रवाह प्रकल्पाशी संबंधित असलेली इतर उपस्करे आणि जोडकामे ; आणि

(क) कोणत्याही नावाने असणारी पाणीपट्टी आणि जलनि:स्सारण कर यांची आणि पाणीपुरवठा आणि जलनि:सारण सेवा यांच्याशी संबंधित असा कोणताही खर्च किंवा फी किंवा आकार यांच्या वसुलीच्या अधिकारासह तसेच शासनाने किंवा कोणत्याही इतर व्यक्तीने पूर्वोक्त-गोष्टीसाठी स्थानिक संस्थांना दिलेल्या खंड (अ) आणि (ब) मध्ये नमूद केलेल्या प्रयोजनां-व्यतिरिक्तच्या प्रयोजनांकरिता उपयोगात आणलेल्या किंवा त्यामुळे परिवर्तित केलेल्या कर्जा-व्यतिरिक्त इतर कर्जामधून उद्‌भवणारी दायित्वे धरून खंड (अ) आणि (ब) मध्ये नमूद केलेल्या बाबींशी संबंधित अशा स्थानिक संस्थांचे सर्व अधिकार, दायित्वे, आणि बोजे,

हे [१][प्राधिकरणाकडून] विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकास [१][प्राधिकरणाकडे] हस्तांतरित आणि निहित होतील आणि त्याच्या नियंत्रणाधीन असतील.

(२) अशा मालमत्ता, मत्ता, अधिकार, दायित्वे आणि बोजे यांचे राज्य शासन ठरवील अशा रीतीने मूल्यांकन करण्यात येईल.

(३) कोणतीही मालमत्ता किंवा मत्ता पोट-कलम (१) अन्वये [१][प्राधिकरणाकडे] निहित झाली आहे किंवा कोणतेही अधिकार, दायित्वे किंवा बोजे या कलमान्वये [१][प्राधिकरणाचे] अधिकार, दायित्वे किंवा बोजे झाले आहेत किंवा कसे यासंबंधी कोणतीही शंका किंवा वाद उद्‌भवल्यास ती शंका आणि वाद राज्य शासनाकडे निर्देशित करण्यात येईल आणि त्याचा निर्णय अंतिम असेल आणि तो (निर्णय) संबंधित [१][प्राधिकरणावर] आणि स्थानिक संस्थेवर बंधनकारक असेल.

(४) स्थानिक संस्थेकडून कोणतीही मालमत्ता किंवा मत्ता ताब्यात घेताना, [१][प्राधिकरण] त्या संस्थेत परस्पर करार करण्यात येईल अशी रक्कम देईल असा करार झाला नसेल तर, राज्य शासन पोट-कलम (२) अन्वये केलेल्या मूल्यांकनांच्या आधारे आणि पाणीपुरवठा आणि [२][जलनि:स्सारण], सेवा यांच्या तरतुदीसाठी स्थानिक संस्थेचे सांविधिक कर्तव्य; वेळोवेळी स्थानिक संस्थेस मिळालेली अनुदाने, स्थानिक संस्थेची शिल्लक असलेली कर्जाची दायित्वे आणि इतर संबंधित गोष्टी विचारात घेऊन स्थानिक संस्थेस द्यावयाची रक्कम ठरवील. राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल आणि तो दोन्ही पक्षांवर बंधनकारक असेल.

**स्थानिक संस्थांकडून ताब्यात घेतलेल्या जलदाय व्यवस्थेकरिता हा अधिनियम लागू असेल अशा गोष्टी-संबंधीची दायित्वे [१][प्राधिकरणाने] हाती घेणे.**

२१. स्थानिक संस्थेकडून [१][प्राधिकरणाने] ताब्यात घेतलेल्या जलदाय व्यवस्थेच्या संबंधात [१][प्राधिकरणाने] जलदाय व्यवस्था ताब्यात घेण्यापूर्वी स्थानिक संस्थेने पत्करलेली कर्जे आणि बोजे, तिने केलेले सर्व करार तिने किंवा तिच्यासह करावयाच्या ठरविलेल्या सर्व बाबी व गोष्टी, ह्या [१][प्राधिकरणाने] किंवा [१][प्राधिकरणाकरिता] पत्करलेल्या, केलेल्या किंवा करावयाच्या गोष्टी समजण्यात येतील आणि स्थानिक संस्थेने दाखल केलेले किंवा कलम २० पोट-कलम (१) अन्वये स्थानिक संस्थेकडे हस्तांतरण किंवा निहित झाले नसते तर जे दाखल करता आले असते किंवा ज्यांचा प्रतिवाद करता आला असता असे सर्व दावे किंवा इतर कायदेशीर कार्यवाह्या या [१][प्राधिकरणाकडुन] किंवा [१][प्राधिकरणाविरुद्ध] चालू ठेवता येतील किंवा दाखल करता येतील किंवा त्यांचा प्रतिवाद करता येईल.

---

[१] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ५ द्वारे "मंडळ" या शब्दा-ऐवजी हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[२] सन १९८० चा महा. अधि. क्र. ८ याच्या कलम ३(अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२२. [1][प्राधिकरण] आणि लगतच्या क्षेत्रांवर अधिकारिता असलेल्या स्थानिक संस्था यांनी पाणीपुरवठा किंवा मलनि:स्सारण सेवा किंवा दोन्ही यांच्या संबंधातील आपापल्या कार्याचा समन्वय करणे सार्वजनिक हितार्थ आहे असे राज्य शासनाचे मत असल्यास, त्यास त्याला योग्य वाटतील असे निदेश [1][प्राधिकरणाला] व इतर स्थानिक संस्थांना देता येतील, अशा निदेशांचे पालन करणे हे [1][प्राधिकरणाचे] व इतर स्थानिक संस्थांचे कर्तव्य असेल.

[1][प्राधिकरण] आणि इतर स्थानिक संस्था यांच्या कार्यांचे समन्वयन.

२३. (१) [1][प्राधिकरणांची] स्थापना झाल्यावर व त्यानंतर राज्य शासनास वेळोवेळी असे निदेश देता येतील की, [3][जे कलम २, खंड (तेरा) मधील नोंदी (१) आणि (२) मध्ये निर्देशिलेल्या अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या प्रवर्गातील आहेत असे] महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी सेवेतील विद्यमान अधिकारी व कर्मचारी यांच्यापैकी ज्यांच्या सेवा राज्य शासनाच्या मते आवश्यकतेपेक्षा अधिक होत असतील त्यांच्या सेवा राज्य शासन विनिर्दिष्ट करील अशा दिनांकापासून (या कलमात यापुढे ज्यांचा ".नियत दिनांक" असा निर्देश केला आहे). समाप्त होतील व त्यांची पदे नष्ट होतील आणि ते त्या दिनांकापासून (जो निरनिराळ्या अधिकाऱ्यांकरिता व कर्मचाऱ्यांकरिता निरनिराळा असू शकेल) [1][प्राधिकरणाचे] अधिकारी किंवा कर्मचारी होतील.

[2][विवक्षित] शासकीय कर्मचाऱ्यांची [1][प्राधिकरणाकडे] बदली करणे.

(२) पोट-कलम (१) अन्वये ज्याच्या संबंधात निदेश देण्यात आला असेल असा, महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी सेवेतील प्रत्येक स्थायी किंवा अस्थायी कर्मचारी नियत दिनांकास आणि तेव्हापासून [1][प्राधिकरणाच्या] आस्थापनेवर नियत दिनांकापासून निर्माण करण्यात येईल अशा स्थायी किंवा अस्थायी पदावर [1][प्राधिकरणाचा] स्थायी किंवा यथास्थिति अस्थायी कर्मचारी होईल.

(३) अशा प्रकारे बदली केलेला कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी हा अधिनियम अंमलात आला नसता तर नियत दिनांकास त्याने त्याचे पद ज्याप्रमाणे धारण केले असते त्याचप्रमाणे त्याच पदावधीसाठी त्याच पारिश्रमिकावर आणि सेवेच्या त्याच इतर शर्तीवर आणि निवृत्तिवेतन, उपदान, भविष्यनिर्वाह निधी आणि इतर बाबी यासंबंधातील तेच अधिकार व विशेषाधिकार यासह [1][प्राधिकरणाकडील] आपले पद धारण करील, राज्य शासनाकडे त्याने केलेली कोणतीही सेवा ही त्याने [1][प्राधिकरणाकडे] केलेली सेवा असल्याचे मानण्यात येईल. [1][प्राधिकरणाकडील] त्याची सेवा रीतसर समाप्त होईपर्यंत किंवा त्याच्या सेवेच्या शर्तीचे त्यावेळी नियमन करणाऱ्या कायद्यानुसार [1][प्राधिकरणाकडून] त्यांचे पारिश्रमिक किंवा सेवेच्या इतर शर्ती यामध्ये योग्य प्रकारे सुधारणा किंवा फेरफार करण्यात येईपर्यंत तो [1][प्राधिकरणाकडे] सेवा करण्याचे चालू ठेवील ;

परंतु, नियत दिनांकाच्या लगतपूर्वी अशा कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा कर्मचाऱ्याच्या प्रकरणास लागू असलेल्या सेवेच्या शर्तीमध्ये राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेने असतील ते खेरीज करून त्या अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास अहितकारक होतील असे कोणतेही बदल करण्यात येणार नाहीत.

---

[1] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ५ द्वारे "मंडळ" या शब्दांऐवजी हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारासह दाखल करण्यात आला.

[2] सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ३(अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ च्या कलम ३(ब) अन्वये "विवक्षित" हा शब्द समाविष्ट करण्यात आला.

(४) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कर्मचाऱ्यांच्या खात्यावर, कोणतेही निवृत्तिवेतन, भविष्यनिर्वाह निधी, उपदान किंवा त्यांच्यासाठी रचना केलेले त्यासारखे इतर निधी यामध्ये जसा असलेल्या रकमा नियत दिनांकापर्यंत देय असलेल्या कोणत्याही संचित व्याजासह आणि अशा निधींशी संबंधित लेख्यांसह राज्य शासनाकडून [१][प्राधिकरणाकडे] हस्तांतरित करण्यात येतील. नियत दिनांकाला आणि त्यानंतर अशा कर्मचाऱ्यांना देय असलेल्या अशा निवृत्तिवेतनाचे, भविष्यनिर्वाह निधीचे, उपदानाचे किंवा त्यासारख्या इतर रकमांचे त्यांच्या सेवा शर्तींना अनुसरून समुचित वेळी प्रदान करण्याचे दायित्व राज्य शासनाचे न राहता [१][प्राधिकरणाचे] राहील.

(५) औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ यामध्ये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पोट-कलम (१) खालील [१][प्राधिकरणाच्या] कोणत्याही कर्मचाऱ्याच्या सेवेची बदली केल्यामुळे अशा कोणत्याही कर्मचाऱ्याला या अधिनियमाखाली किंवा अशा इतर कायद्याखाली कोणतीही भरपाई मिळण्याचा हक्क असणार नाही आणि अशी कोणतीही मागणी कोणत्याही न्यायालयाकडून, न्यायाधिकरणाकडून किंवा प्राधिकरणाकडून विचारार्थ स्वीकारण्यात येणार नाही.

(६) नियत दिनांकापासून दोन महिन्यांमध्ये किंवा राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा वाढविलेल्या कालावधीमध्ये जो कर्मचारी [१][प्राधिकरणाचा] कर्मचारी होण्याचा किंवा [१][प्राधिकरणाचा] कर्मचारी म्हणून पदावर राहण्याचा आपला इरादा नसल्याचे राज्य शासनाला लेखी नोटीस देऊन कळवील, अशा कोणत्याही कर्मचाऱ्याला पोट-कलम (१) मधील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही. कोणत्याही कर्मचाऱ्यांकडून अशी नोटीस मिळाली असेल अशा बाबतीत —

(अ) स्थायी कर्मचाऱ्याच्या बाबतीत, नियत दिनांकाला तो शासकीय सेवेतून निवृत्त झाला असता तर त्याला जे सेवानिवृत्ती वेतन, उपदान, भविष्यनिर्वाह निधीविषयक लाभ व इतर लाभ उपार्जित झाले असते असे सर्व लाभ देऊन सेवानिवृत्त होण्याची परवानगी देण्यात येईल ;

(ब) अस्थायी कर्मचाऱ्यांच्याबाबतीत, राज्य शासनाच्या विद्यमान सेवा नियमानुसार त्याला नोटीस देऊन किंवा नोटिशीच्या ऐवजी पारिश्रमिक देऊन त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

(७) पूर्ववर्ती पोट-कलमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(अ) महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी सेवेमध्ये असणाऱ्या ज्या व्यक्तीविरुद्ध या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी कोणतीही शिस्तभंगाची कार्यवाही प्रलंबित असेल किंवा जिला तिच्या सेवेच्या समाप्तीची किंवा सक्तीच्या सेवानिवृत्तीची कोणतीही नोटीस किंवा आदेश देण्यात आला असेल, अशा कोणत्याही व्यक्तीची [१][प्राधिकरणाकडे] बदली करण्यात येणार नाही आणि अशा व्यक्तीवर उक्त दिनांकानंतर राज्य शासन त्याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा रीतीने आणि अशा प्राधिकरणाद्वारे कार्यवाही करता येईल.

(ब) राज्य शासनाच्या कोणत्याही कर्मचाऱ्यांची सेवा पोट-कलम (१) अन्वये [१][प्राधिकरणाकडे] हस्तांतरित करण्यात आली असेल तर अशा हस्तांतरणानंतर असा कर्मचारी राज्य शासनाच्या सेवेत असताना त्याने केलेली कोणतीही कृती किंवा अकृती किंवा वर्तणूक किंवा अभिलेख लक्षात घेऊन अशा कर्मचाऱ्यांच्या विरुद्ध किंवा त्यांच्या संबंधात [१][प्राधिकरणाकडे] करणे योग्य वाटेल अशी शिस्तभंगाची किंवा इतर कार्यवाही करण्यास [१][प्राधिकरण] सक्षम असेल.

---

१. सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २५ याच्या कलम ५ द्वारे "मंडळ" या शब्दाऐवजी हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

शासकीय कर्मचाऱ्यांना [२][प्राधिकरणाकडे] प्रतिनियुक्तिवर पाठविण्याचा शासनाचा अधिकार.

[१]२३अ. (१) या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये [२][प्राधिकरणाला] कोणतेही अधिकार, विवक्षित कर्तव्ये आणि कार्ये प्रदान करण्यात आल्यामुळे जर राज्य शासनाच्या मते, कलम २, खंड (तेरा) यातील नोंदी (३) व (४) यात निर्देशिलेल्या प्रवर्गातील कोणत्याही अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी सेवेतील कोणतीही पदे राज्य शासनाच्या गरजांच्या प्रमाणात संपूर्णतः किंवा अंशतः अतिरिक्त झालेली असतील किंवा अतिरिक्त होण्याची शक्यता असेल तर, किंवा [२][प्राधिकरणाला] कार्यक्षमतेने त्याच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी, कर्तव्यांचे पालन करण्यासाठी आणि कार्ये पार पाडण्यासाठी त्याला अशा अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या सेवा आवश्यक झाल्या असतील तर, राज्य शासनास, राज्य शासनाच्या विभाग प्रमुखास किंवा राज्य शासनाने या बाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास वेळोवेळी त्या संबधातील गरज लक्षात घेऊन आदेशाद्वारे, अशा अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना [२][प्राधिकरणाकडे] प्रतिनियुक्तीवर पाठवता येईल आणि [२][प्राधिकरण] या कलमाच्या तरतुदीस अधीन राहून त्यांना आपल्या सेवेत घेईल व त्यांची प्रतिनियुक्तीवर नेमणूक करील.

(२) अशा कोणत्याही कर्मचाऱ्याचा प्रतिनियुक्तीचा कालावधी, [२][प्राधिकरणाने] त्याला आपल्या सेवेत घेतल्याच्या तारखेपासून (या कलमात यापुढे जिचा निर्देश "नियत तारीख" असा करण्यात आला आहे) दोन वर्षे एवढा राहील; मात्र [२][प्राधिकरणांच्या] व राज्य शासनाच्या संमतीने तो एकूण पाच वर्षांहून अधिक न होणाऱ्या दीर्घ कालावधीसाठी प्रतिनियुक्तीवर राहण्याचे पसंत करील, किंवा [२][प्राधिकरणांशी] विचारविनिमय करून राज्य शासनाकडून कोणत्याही वेळी त्याला शासकीय सेवेमध्ये परत बोलावण्यात येईल ते खेरीज करून, प्रतिनियुक्तीचा कालावधी संपल्यानतर तो राज्य शासनाच्या सेवेमध्ये परत गेलेला असेल.

(३) अशा रितीने प्रतिनियुक्त केलेल्या कोणत्याही कर्मचाऱ्यास प्रतिनियुक्तीचा दोन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर शासकीय सेवेत परत जाण्याची आपणास परवानगी मिळावी किंवा [२][प्राधिकरणाच्या] सेवेमध्ये सामावून घेतले जाण्यास आपणास परवानगी मिळावी अशी विनंती राज्य शासनाकडे करण्याचा विकल्प (ऑप्शन) राहील व असा विकल्प तो नियत तारखेपासून एक वर्ष मुदतीच्या आत राज्य शासनास लेखी नोटीस देऊन वापरील. जर [२][प्राधिकरण] कलम २३ मध्ये निर्धारित करण्यात आल्या असतील अशाच अटींवर व शर्तींवर त्याला आपल्या सेवेत सामावून घेण्याचे मान्य करील तर, तो [२][प्राधिकरणाने] विनिर्दिष्ट केलेल्या तारखेपासून [२][प्राधिकरणाचा] कर्मचारी होईल आणि कलम २३ च्या तरतुदी जणू तो त्या कलमाखाली [२][प्राधिकरणाकडे] बदली झालेला कर्मचारी असल्याप्रमाणे योग्य त्या फेरफारांसह त्याला लागू होतील. पूर्वोक्तप्रमाणे वेळेवर नोटीस देण्यास कोणताही कर्मचारी कसूर करील तर त्याने, प्रतिनियुक्तीचा दोन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर शासकीय सेवेत परत जाण्याचे पसंत केले आहे असे मानण्यात येईल.

(४) सक्तीच्या प्रतिनियुक्तीच्या पहिल्या दोन वर्षांच्या कालावधीत, जर संबंधित कर्मचाऱ्यास त्याच्या मूळ विभागात बढती मिळण्याचा हक्क प्राप्त झाला तर त्याला त्याच्या लेखी विनंतीनुसार त्याच्या मूळ विभागात जाण्यासाठी किंवा जर तो [२][प्राधिकरणाकडे] प्रतिनियुक्तीवर राहिला तर, त्यास औपचारिक (प्रोफॉर्मा) बढतीसाठी परवानगी देण्यात येईल.

(५) [२][प्राधिकरणाकडे] प्रतिनियुक्तीवर असणाऱ्या कोणत्याही कर्मचाऱ्यास कोणताही प्रतिनियुक्ती भत्ता मिळण्याचा हक्क असणार नाही.

(६) [२][प्राधिकरणाकडे] प्रतिनियुक्तीवर असणाऱ्या कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते [२][प्राधिकरणाच्या] निधीतून देण्यात येतील.

---

[१]. सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ८ याच्या कलम ४ द्वारे कलम २३अ समाविष्ट करण्यात आले.

[२]. सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २५ याच्या कलम ५ द्वारे "मंडळ" या शब्दाऐवजी हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

(७) या कलमात अन्यथा तरतूद करण्यात आली असेल ते खेरीजकरून, [1][प्राधिकरणाकडे] प्रतिनियुक्तीवर असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक अटी व शर्ती प्रतिनियुक्तीच्या लगतपूर्वी त्यांना लागू असणाऱ्या अटी व शर्तींपेक्षा कमी फायदेशीर असणार नाहीत व राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीशिवाय त्यामध्ये त्यांचे नुकसान होईल अशा रीतीने बदल करण्यात येणार नाही. ]

## प्रकरण चार

### संविदा, वित्त व्यवस्था, लेखे आणि लेखापरीक्षा

**संविदा इत्यादी करणे** २४. [1][प्राधिकरणाच्या] वतीने केलेली कोणतीही संविदा किंवा मालमत्तेचे हस्तांतरणपत्र लेखी असेल आणि विनियमांद्वारे तरतूद करण्यात येईल अशा प्राधिकरणांकडून किंवा अधिकाऱ्यांकडून आणि अशा रीतीने ते करण्यात येईल.

**[1][प्राधिकरणाचा] निधी.** २५. [1][प्राधिकरणाकडे] [1][प्राधिकरणाचा] "निधी" म्हणून संबोधावयाचा त्याचा स्वतःचा निधी असेल. तो स्थानिक निधी असल्याचेही मानण्यात येईल आणि कर्जाखेरीज इतर प्रकाराने, किंवा [1][प्राधिकरणाला] [1][प्राधिकरणाच्या] वतीने मिळालेल्या सर्व रकमा त्यामध्ये जमा करण्यात येतील.

**[1][प्राधिकरणाचे] इतर निधी.** २६. (१) [1][प्राधिकरणाकडे] "कर्जनिधी" म्हणून संबोधावयाचा आणखीही एक निधी असेल तोही स्थानिक निधी असल्याचे मानण्यात येईल आणि कर्जाच्या रुपाने [1][प्राधिकरणाला] किंवा [1][प्राधिकरणाच्या] वतीने मिळालेल्या सर्व रकमा त्यामध्ये जमा करण्यात येतील.

(२) कलम २५ किंवा या कलमाचे पोट-कलम (१) यांच्या तरतुदींना बाध न येऊ देता राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने [1][प्राधिकरणाला] या अधिनियमाखालील आपल्या कर्तव्याचे कार्यक्षमरितीने पालन करण्यासाठी आणि आपली कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक असतील अशा इतर निधींची रचना करता येईल.

**[1][प्राधिकरणाच्या] वित्त व्यवस्थेसाठी सर्वसाधारण तत्वे.** २७. [1][प्राधिकरण] शक्य असेल तेथवर राज्य शासनाकडून अनुदान किंवा अर्थसहाय्याची रक्कम घेतल्यानंतर या अधिनियमाखालील आपली कार्ये, तोट्यात चालविणार नाही.

**[1][प्राधिकरणाला] अनुदाने व अर्थसहाय्य.** २८. राज्य शासनास त्याबाबतीत योग्य रीतीने करण्यात येतील अशा विनियोजनाद्वारे राज्य शासन निर्धारित करील अशा अटी व शर्तीवर, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी [1][प्राधिकरणाला] वेळोवेळी अनुदाने किंवा अर्थसहाय्य देता येईल.

**[1][प्राधिकरणाला] कर्जे.** २९. राज्य शासनाला, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील अशा, राज्य शासनाला आणि [1][प्राधिकरणाला] मान्य असतील अशा अटी व शर्तीवर [1][प्राधिकरणाला] वेळोवेळी कर्जे देता येतील.

---

[1] सन १९९७ चा महा. अधि. क्र. २५ याच्या कलम ५ द्वारे "मंडळ" या शब्दाऐवजी हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

**[१][प्राधिकरणाच्या] निधीमधील शासनाचे प्रारंभिक अंशदान.**

३०. त्याबाबतीत योग्यरितीने करण्यात आलेल्या विनियोजनाद्वारे, राज्य शासनाला एक कोटी रुपये किंवा त्याला योग्य वाटेल अशी कमी रक्कम [१][प्राधिकरणाच्या] निधीमध्ये प्रारंभिक अंशदान म्हणून देता येईल.

**कर्जे घेण्याचे आणि पुन्हा कर्जे देण्याचे अधिकार.**

३१. (१) [१][प्राधिकरणाला] राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने आणि या अधिनियमाच्या तरतुदींच्या आणि राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे लादील अशा शर्तींच्या अधीन राहून, राज्य शासनाने या प्रयोजनासाठी मान्यता दिलेल्या बँकेशी किंवा इतर संस्थांशी किंवा परिसंस्थांशी व्यवस्था करून, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असलेली कोणतीही रक्कम वेळोवेळी कर्जाऊ घेता येईल.

(२) [१][प्राधिकरणाला] अशारितीने कर्जाऊ घेतलेल्या रकमेचा कोणताही भाग, स्थानिक संस्थेला पाणीपुरवठा आणि जलनिस्सारण सेवा यांच्याशी संबंधित असलेल्या तिच्या कर्तव्याचे पालन करण्यासाठी आणि कार्य पार पाडण्यासाठी [१][प्राधिकरण] निर्धारित करील अशा अटी व शर्तींवर देता येईल.

**घसारा राखीव निधी.**

३२. [१][प्राधिकरण] घसारा राखीव निधी निर्माण करील आणि विहित करण्यात येतील अशा तत्वानुसार त्यासाठी वार्षिक तरतूद करील.

**शासन हमीदार असणे.**

३३. या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी [१][प्राधिकरणाला] दिलेल्या किंवा त्याच्याकडे हस्तांतरित केलेल्या कोणत्याही कर्जाच्या परतफेडीसाठी आणि सर्व किंवा कोणत्याही कर्जावरील व्याजाच्या प्रदानासाठी राज्य शासनास हमी देता येईल.

**लेखे आणि लेखापरीक्षा.**

३४. (१) [१][प्राधिकरण], वित्तीय वर्षाच्या प्रारंभापूर्वी आणि वित्तीय वर्षामध्ये कोणत्याही वेळी त्या वर्षामधील त्याच्या कृतीच्या कार्यक्रमाचे विवरणपत्र किंवा यथास्थिति पूरक विवरणपत्र आणि तसेच त्याच्या संदर्भातील वित्तीय अंदाज तयार करील आणि ते राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निदेश देईल अशा नमुन्यामध्ये आणि अशा तारखेपर्यंत राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेसाठी राज्य शासनाला सादर करील.

परंतु, ज्या वित्तीय वर्षासाठी असे वित्तीय विवरणपत्र सादर केले असेल त्या वर्षाच्या प्रारंभापूर्वी अशी पूर्व मान्यता मिळाली नसेल अशावेळी [१][प्राधिकरणाला] सर्व लेख्यांवर मागील वित्तीय वर्षाच्या संबद्ध कालावधीमध्ये मान्यता देण्यात आलेल्या रकमेपेक्षा अधिक असणार नाही इतक्या रकमेपर्यंतची रक्कम खर्च करण्याचा हक्क असेल आणि अशा रकमेमध्ये, उक्त कालावधीमधील अनुदानातून आणि अर्थसहाय्यामधून खर्च केलेल्या कोणत्याही रकमेचा अंतर्भाव असणार नाही.

(२) [१][प्राधिकरण] आपल्या लेख्यांच्या संबंधात, विनियमांद्वारे आवश्यक असतील आणि योग्य ती लेखापुस्तके आणि इतर पुस्तके ठेवण्याची व्यवस्था करील आणि अशा नमुन्यात आणि अशा रीतीने ताळेबंद तयार करील.

(३) [१][प्राधिकरणाच्या] लेख्यांची, राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांद्वारे निदेश देईल अशा लेखा-परीक्षकाकडून अशा रीतीने आणि अशा वेळी लेखापरीक्षा करण्यात येईल. अशा प्रकारे नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकाला अशा बाबींशी संबंधित कागदपत्रे सादर करण्यास आणि अशी माहिती देण्यास फर्मावण्याचे अधिकार असतील आणि नामंजुरी आणि अधिभार यांच्या संबंधात विहित करण्यात आलेले अधिकार असतील.

---

[१] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ५ द्वारे "मंडळ" या शब्दाऐवजी हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

(४) [1][प्राधिकरणाचे] लेखापरीक्षकाने प्रमाणित केल्याप्रमाणे असलेले लेखे त्यावरील लेखा-परीक्षा अहवालासह राज्य शासनाला दरवर्षी अग्रेषित करण्यात येतील. राज्य शासन त्याला योग्य वाटतील असे निदेश [1][प्राधिकरणाला] देईल आणि [1][प्राधिकरण] अशा निदेशाचे अनुपालन करील.

(५) राज्य शासन, त्याला योग्य वाटेल अशा रीतीने [1][प्राधिकरणाचे] लेखे प्रकाशित करण्याची व्यवस्था करील.

## प्रकरण पांच

### फी आणि आकार

पाण्याचा खर्च.

३५. (१) [1][प्राधिकरण] पुरवठा करावयाच्या पाण्याचा खर्च, त्याच्या परिमाणानुसार आणि तसेच प्रत्येक जोडणीच्या बाबतीतील किमान खर्चही राजपत्रातील अधिसूचनेद्वारे ठरवील.

(२) पाण्याचा खर्च परिमाणांनुसार आकारण्याऐवजी [1][प्राधिकरणाला] कोणत्याही ग्राहकाकडून विनिर्दिष्ट कालावधीसाठी, त्या कालावधीत त्याच्याकडून अपेक्षित असलेल्या पाण्याच्या वापराच्या आधारे एखादी ठराविक रक्कम स्वीकारता येईल.

सांडपाण्याच्या विल्हेवाटीचा खर्च.

३६. (१) [1][प्राधिकरण] सांडपाण्याच्या परिमाणानुसार त्याच्या विल्हेवाटीचा खर्च (हे परिमाण ग्राहकाला पुरवठा करण्यात आलेल्या पाण्याच्या एकूण परिमाणाच्या विहित केलेल्या टक्केवारी इतके असू शकते) आणि अशा विल्हेवाटीच्या बाबतीत आकारावयाचा किमान खर्च ही राजपत्रातील अधिसूचनेद्वारे ठरवील.

(२) सांडपाण्याच्या विल्हेवाटीचा खर्च पोटकलम (१) मध्ये नमूद केलेल्या तत्वावर आकारण्या-ऐवजी [1][प्राधिकरणाला] कोणत्याही ग्राहकाकडून विनिर्दिष्ट कालावधीसाठी त्या कालावधीत त्याच्याकडून अपेक्षित असलेल्या सांडपाण्याच्या विल्हेवाटीच्या आधारे एखादी ठराविक रक्कम स्वीकारता येईल.

मीटर भाडे आणि सेवेसाठी फी.

३७. (१) [1][प्राधिकरणाला] मीटरचा पुरवठा करता येईल आणि उप विधीद्वारे तरतूद करण्यात येईल अशा दराने मीटरांसाठी भाडे आकारता येईल.

(२) [1][प्राधिकरणाला] कोणत्याही पाणीपुरवठ्याच्या किंवा मलप्रणालाच्या जोडणीसाठी, जोडणी तोडण्यासाठी, परत जोडणी करण्यासाठी किंवा चाचणीसाठी किंवा पर्यवेक्षणासाठी किंवा केलेल्या इतर कोणत्याही सेवेसाठी किंवा केलेल्या कामासाठी किंवा पर्यवेक्षणासाठी उप-विधीद्वारे तरतूद करण्यात येईल अशा दराने फी आकारता येईल.

ठेवी.

३८. [1][प्राधिकरणाला] उप-विधीद्वारे तरतूद करून कोणत्याही ग्राहकाला किंवा ग्राहकांच्या वर्गाला, त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी रक्कम देय रकमांचे सत्वर प्रदान होण्यासाठी आणि त्यांना ज्या शर्तींच्या अधीन राहून सेवा पुरविण्यात येतात त्याचे योग्य पालन व्हावे यासाठी तारण म्हणून ठेवण्यास भाग पाडता येईल आणि मंडळाच्या देय रकमा अशा ठेवलेल्या रकमेतून वसूल करणे हे विधिसंमत असेल.

[1][प्राधिकरणाला] देय असलेल्या रकमांची वसुली.

३९. पाण्याचा खर्च, सांडपाण्याच्या विल्हेवाटीचा खर्च, मीटर भाडे, फी, आकार म्हणून [1][प्राधिकरणाला] किंवा अन्यथा या अधिनियमान्वये [1][प्राधिकरणाला] देय असलेली इतर कोणतीही रक्कम वसुलीच्या इतर कोणत्याही पद्धतीला बाध न आणता, जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसुलीयोग्य असेल.

---

[1] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ५ द्वारे "मंडळ" या शब्दाऐवजी हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

## प्रकरण सहा

### पाणीपुरवठा

४०. या अधिनियमाखालील घरगुती कामासाठी पाणीपुरवठी म्हणजे खालील प्रयोजने सोडून इतर कोणत्याही प्रयोजनार्थ केलेला पाणीपुरवठा. घरगुती प्रयोजनांसाठी पाणी-पुरवठ्याची व्याख्या.

(अ) कोणताही व्यापार, निर्मिती किंवा कामधंदा यासाठी ;

(ब) उद्यानासाठी किंवा जलसिंचनाच्या प्रयोजनासाठी ;

(क) रस्त्यांच्या बांधकामासह बांधकामाच्या प्रयोजनासाठी ;

(ड) कारंजी, पोहण्याचे तलाव, सार्वजनिक स्नानगृहे किंवा इतर कोणत्याही शोभेच्या किंवा यांत्रिक प्रयोजनासाठी ;

(ई) प्राणी विक्रीसाठी किंवा भाड्याने देण्यासाठी किंवा त्यांच्यापासून मिळालेले उत्पादन विक्रीसाठी जेथे ठेवण्यात येत असेल तेथे अशा प्राण्यांसाठी ;

(फ) उपाहारगृहातील किंवा हॉटेल, खाणावळ किंवा निवासी क्लब यातील रहिवाशांच्या पिण्याच्या किंवा वापराच्या प्रयोजनांसाठी ;

(ग) नाट्यगृहे किंवा चित्रपटगृहे येथे जाणाऱ्या व्यक्तींच्या पिण्याच्या किंवा वापराच्या प्रयोजनासाठी ;

(ह) रस्त्यावर शिंपडण्याच्या प्रयोजनासाठी ;

(आय) जेथे वाहने विक्रीसाठी किंवा भाड्याने देण्यासाठी ठेवली असतात तेथे ती धुण्याच्या प्रयोजनासाठी.

४१. उप-विधिद्वारे तरतूद करण्यात येईल अशा परिस्थितीत किंवा अशा शर्तींना अधीन असेल त्याखेरीज कोणतीही व्यक्ती [1][प्राधिकरणाने] घरगुती प्रयोजनार्थ पुरवठा केलेले पाणी इतर कोणत्याही प्रयोजनार्थ वापरणार नाही किंवा वापरू देणार नाही. घरगुती प्रयोजनार्थ केलेला पाणीपुरवठा बिगर घरगुती प्रयोजनार्थ वापरता कामा नये.

४२. (१) [1][प्राधिकरणाने] लायसन दिलेल्या नळ कारागीरांव्यतिरिक्त इतर कोणतीही व्यक्ती ; पाण्याच्या जोडणीच्या बाबतीत कोणतेही काम ते किरकोळ काम नसल्यामुळे करणार नाही आणि कोणतीही व्यक्ती असे कोणतेही काम लायसनधारी मूळ कारागीरांव्यतिरिक्त इतर व्यक्तींकडून करून घेण्यास परवानगी देणार नाही. लायसनधारी नळ कारागीर.

(२) पोट-कलम (१) मधील तरतुदींचे उल्लंघन करून कोणतेही काम करण्यात आले तर असे काम [1][प्राधिकरणाच्या] स्वेच्छानिर्णयानुसार तोडून टाकले जाण्यास पात्र असेल.

४३. (१) ज्या परिवास्तूला [1][प्राधिकरणाकडून] पाणीपुरवठा करण्यात येतो अशा परिवास्तूचा मालक किंवा भोगवटादार पाण्याचा अपव्यय करणार नाही किंवा होऊ देणार नाही किंवा सेवा नळ किंवा तोटी किंवा इतर जोडणीकाम किंवा त्यांच्याशी संबंधित काम, पाण्याचा अपव्यय होईल अशा रितीने नादुरुस्त स्थितीत राहू देणार नाही. पाण्याचा अपव्यय करण्यास मनाई.

---

[1] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ५ द्वारे "मंडळ" या शब्दाऐवजी हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

(२) ज्या ज्या वेळी [१][प्राधिकरणाला] असे सकारण वाटेल की, सेवा नळ किंवा तोटी किंवा इतर जोडणीकाम किंवा त्यांच्याशी संबंधित काम यातील बिघाडामुळे पाण्याचा अपव्यय होत आहे त्या त्या वेळी [१][प्राधिकरण] लेखी नोटीशीद्वारे त्या ग्राहकाला असा बिघाड विनिर्दिष्ट कालावधीत दुरुस्त करण्यास भाग पाडू शकेल.

(३) जर अशी दुरुस्ती विनिर्दिष्ट कालावधीत करण्यात आली नाही तर [१][प्राधिकरण] या अधिनियमाखालील इतर कोणत्याही कार्यवाहीला बाध न आणता, अशी दुरुस्ती करून घेऊ शकेल. अशा दुरुस्तीचा खर्च ग्राहकाकडून वसूल करण्यात येईल.

पाणीपुरवठा तोडण्याचा अधिकार.

४४. (१) [१][प्राधिकरण] पुढीलबाबतीत कोणत्याही परिवास्तूमधील पाणीपुरवठा तोडता येईल :—

(अ) या अधिनियमान्वये देय असलेली कोणतीही फी, भाडे, पाण्याचा खर्च किंवा कोणताही आकार किंवा कोणतीही रक्कम, त्याचे देयक दिल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत भरण्यात आली नसेल; किंवा

(ब) असे करण्यापासून परावृत्त होण्यासाठी त्यास बजावणारी [१][प्राधिकरणाची] लेखी नोटीस मिळाल्यानंतर या अधिनियमाच्या किंवा कोणत्याही नियमांच्या किंवा विनियमांच्या किंवा उप-विधीच्या तरतुदीचे उल्लंघन करून ग्राहक पाण्याचा वापर करीत असेल किंवा ते वापरण्यास परवानगी देत असेल ; किंवा

(क) ग्राहकाने पाण्याच्या कोणत्याही मीटरचे किंवा कोणत्याही जोडणी नळाचे किंवा लोहवलयाचे (फेरलचे) नुकसान केले असेल किंवा नुकसान होण्यास, तो कारणीभूत झाला असेल; किंवा

(ड) कोणतेही काम करण्यासाठी किंवा कोणताही उपकरण संच बसविण्यासाठी किंवा तो काढण्यासाठी किंवा पाणीपुरवठ्याशी संबंधित अशी कोणतीही तपासणी किंवा चौकशी करण्यासाठी तेथे प्रवेश करण्याचे योजिलेल्या, त्याबाबतीत यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या [१][प्राधिकरणाच्या] कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास त्या परिवास्तूत प्रवेश करू देण्याचे ग्राहकाने नाकारले असेल किंवा अशा, कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास असे कोणतेही काम करू देण्यास किंवा कोणताही उपकरण संच बसविण्यास किंवा तो काढून टाकण्यास किंवा अशी तपासणी किंवा चौकशी करू देण्यास प्रतिबंध केला असेल; किंवा

(ई) जर, याबाबतीत [१][प्राधिकरणाच्या] रीतसर प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने किंवा सेवकाने तपासल्यानंतर सेवा नळ किंवा कोणतीही तोटी किंवा त्यास जोडलेली इतर कोणतीही जोडणी किंवा काम यामध्ये पाण्याचा अपव्यय होईल किंवा ते दूषित होईल इतपत बिघाड झाला आहे व त्याचा तात्काळ प्रतिबंध करणे आवश्यक आहे असे त्यास आढळून आले असेल; किंवा

(फ) ग्राहकाने, या अधिनियमाच्या किंवा नियमाच्या किंवा विनियमाच्या किंवा उपविधीच्या तरतुदींचा भंग करून कोणताही सेवा नळ किंवा कोणतीही तोटी किंवा इतर जोडणी किंवा त्यांच्याशी संबंधित काम बसविण्याची, काढून टाकण्याची, दुरुस्त करण्याची किंवा इतर प्रकाराने त्यात हस्तक्षेप करण्याची व्यवस्था केली असेल किंवा अशी व्यवस्था करण्यास परवानगी दिली असेल; किंवा

(ग) सेवा नळ किंवा कोणतीही तोटी किंवा इतर जोडणी किंवा काम यामधील गळती सार्वजनिक रस्त्याला नुकसान पाहोचण्यास कारणीभूत होत असेल आणि त्याला तातडीने प्रतिबंध घालणे आवश्यक असेल;

(२) या कलमाखाली किंवा त्या अनुसार केलेल्या कोणत्याही कार्यवाहीमुळे एखाद्या व्यक्तीला एरवी पत्करावी लागली असती अशा कोणत्याही शास्तीमधून किंवा दायित्वामधून सूट मिळणार नाही.

---

[१]सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ५ द्वारे "मंडळ" या शब्दाऐवजी हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

(३) उप-विधीमध्ये तरतूद करण्यात येईल अशा आकाराच्या प्रदानानंतर आणि अशा अटी व शर्तींवर पोट-कलम (१) खाली बंद केलेला पाणीपुरवठा [१][प्राधिकरणाला] पुन्हा सुरू करता येईल.

४५. (१) कोणतीही व्यक्ती,—— इतर विवक्षित कृतींना मनाई.

(अ) [१][प्राधिकरणाच्या] प्राधिकाराव्दये कार्य करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही कामाचे तळजमीन नळ बसविण्यास बुद्धिपुरस्सर अडथळा करणार नाही, किंवा अशा कामाचे तळजमीन नळ बसविण्याच्या प्रयोजनासाठी मैदानावर रोवलेला कोणताही स्तंभ, खांब, किंवा खुंट्या उपटून टाकणार नाही किंवा हलविणार नाही किंवा उक्त प्रयोजनासाठी केलेले कोणतेही काम विद्रुप करणार नाही किंवा नष्ट करणार नाही ; किंवा

(ब) [१][प्राधिकरणाच्या] मालकीचे कोणतेही कुलूप, तोटी, झडप, नळ मीटर किंवा इतर काम किंवा उपकरण संच बुद्धिपुरस्सर किंवा निष्काळजीपणाने तोडणार नाही, त्यांना हानी पोहोचविणार नाही, ते बदलणार नाही, उघडणार नाही, बंद करणार नाही, थांबवणार नाही किंवा इतर प्रकारे त्यात हस्तक्षेप करणार नाही ; किंवा

(क) [१][प्राधिकरणाच्या] मालकीच्या कोणत्याही जलदाय व्यवस्थेमधील किंवा ज्याच्या मधून असा कोणताही पाणीपुरवठा करण्यात येतो अशा जलप्रवाहांमधील प्रवाह किंवा स्रोत यांना अवध रीतीने अडथळा आणणार नाही, पाणी काढणार नाही किंवा वळवणार नाही किंवा घेणार नाही ; किंवा

(ड) [१][प्राधिकरणाच्या] कोणत्याही अधिकाऱ्याला, किंवा कर्मचाऱ्याला या प्रकरणाखालील त्याची कर्तव्ये किंवा कार्ये त्यांचे पालन करण्यात किंवा ती पार पाडण्यात अडथळा आणणार नाही किंवा कोणत्याही जलदाय व्यवस्थेच्या संबंधात, कोणताही प्रवेश करण्यासाठी, निरीक्षणा साठी, तपासणीसाठी किंवा चौकशी करण्यासाठी त्याला आवश्यक ती साधने पुरवण्यास नकार देणार नाही किंवा त्याकडे बुद्धिपुरस्सर दुर्लक्ष करणार नाही ; किंवा

(ई) कोणत्याही जलदाय, व्यवस्थेच्या आत, बाजूला किंवा त्यावर, आंघोळ करणार नाही किंवा जनावरे धुणार नाही, फेकणार नाही किंवा त्यांना त्यात प्रवेश करण्यास कारणीभूत होणार नाही किंवा कोणताही केर, कचरा किंवा घाण टाकणार नाही किंवा त्यात कोणताही कपडा, लोकर किंवा चामडे किंवा एखाद्या प्राण्याचे कातडे धुणार नाही किंवा एखादी मोरी, नाला किंवा वाफेचे इंजिन किंवा बाष्पके, यातील पाणी किंवा कोणतेही इतर दूषित पाणी त्यामध्ये वळवण्याची किंवा आणून सोडण्याची व्यवस्था करणार नाही किंवा [१][प्राधिकरणाच्या] मालकीच्या कोणत्याही जलदाय व्यवस्थेतील पाणी ज्यामुळे दूषित होईल किंवा होण्याची शक्यता असेल असे इतर कोणतेही कृत्य करणार नाही.

(२) पोट-कलम (१) च्या खंड (ब) मधील कोणतीही गोष्ट एखाद्या ग्राहकाने त्याच्या परिवास्तूस पाणीपुरवठा करणाऱ्या सेवा नळावर बसवलेला स्टॉप कॉक बंद करण्याच्या बाबतीत लागू असणार नाही. मात्र असे केल्याने ज्याच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम होत असेल अशा इतर कोणत्याही ग्राहकाची संमती त्याने मिळवलेली असली पाहिजे.

---

१. सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ५ द्वारे "मंडळ" या शब्दांऐवजी हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

## प्रकरण सात

### जलनिःसारण

मालक किंवा भोगवटादार यांचा मलप्रणाल जोडून मिळण्याचा अधिकार.

४६. कोणत्याही परिवास्तूचा मालक किंवा भोगवटादार याला त्या परिवास्तूतील मलप्रवाह [1][प्राधिकरणाच्या] मलप्रणालात रिकामी करण्याचा हक्क असेल, परंतु असे करण्यापूर्वी त्याने,--

(अ) [1][प्राधिकरणाची] लेखी परवानगी घेतली पाहिजे आणि उप विधी अनुसार जोडणी फी व इतर आकार दिला पाहिजे ; आणि

(ब) उप विधीमध्ये तरतूद करण्यात येतील अशा इतर शर्ती पूर्ण केल्या पाहिजेत.

मलप्रणाल जोडणी करवून घेण्यास मालकास भाग पाडण्याचा अधिकार.

४७. कोणतीही परिवास्तू घाण व्यवस्थितपणे वाहून नेण्याच्या पुरेशा साधनाविशाय आहे व [1][प्राधिकरणाचा] मलप्रणाल अशा परिवास्तूतील कोणत्याही भागापासून पन्नास मीटर अंतरावर आहे असे [1][प्राधिकरणाचे] मत होईल त्या बाबतीत [1][प्राधिकरणास] लेखी नोटिशीद्वारे उप-विधींमध्ये तरतूद केल्याप्रमाणे मलप्रणालाशी जोडणी करवून घेण्यास उक्त परिवास्तूच्या मालकास फर्मावित येईल.

परवानगी-शिवाय मलप्रणाल जोडणीस मनाई.

४८. कोणतीही व्यक्ती [1][प्राधिकरणाच्या] परवानगीशिवाय [1][प्राधिकरणाच्या] कोणत्याही मलप्रणालाशी कोणतीही जोडणी करणार नाही किंवा अशा जोडणीसंबंधात व्यवस्था करणार नाही.

मलप्रणालावर परवानगी-शिवाय खाजगी रस्ता किंवा इमारत बांधण्यास मनाई.

४९. कोणतीही व्यक्ती, [1][प्राधिकरणाच्या] परवानगीशिवाय [1][प्राधिकरणाच्या] कोणत्याही मलप्रणालावर कोणताही खाजगी रस्ता, इमारत याचे बांधकाम किंवा इतर बांधकाम करणार नाही.

मलप्रणाल किंवा मलकुंड (सेसपूल) यामध्ये हवा खेळती राहण्यासाठी पोकळ खांब इत्यादी बसवण्याचा अधिकार.

५०. [1][प्राधिकरणास] कोणत्याही मलप्रणालात किंवा मलकुंडात (सेसपूल) हवा खेळती राहण्याच्या प्रयोजनार्थ मग ते, [1][प्राधिकरणांकडे] निहित झालेले असो किंवा नसो, कोणत्याही परिवास्तूत किंवा कोणत्याही इमारतीबाहेर किंवा कोणत्याही झाडाजवळ, आवश्यक असल्याचे दिसून येईल असा कोणताही पोकळ खांब किंवा पाईप बसवता येईल.

---

1. सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ५ द्वारे "मंडळ" या शब्दाऐवजी हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

**सदोष असल्याचे आढळण्यात आलेल्या मलप्रणालांची तपासणी व चाचणी करण्याचा अधिकार.**

५१. (१) खाजगी मलप्रणाल किंवा मलकुंड आरोग्यास विघातक ठरेल किंवा उपद्रवकारक होईल अशा स्थितीत आहे किंवा [1][प्राधिकरणाच्या] मलप्रणालात त्यातून प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे पाणी जाते अशा खाजगी मलप्रणालात भूपृष्ठाखालील पाणी साचू शकते किंवा रेती किंवा इतर पदार्थ अडकू शकतात इतका तो सदोष असल्याचे समजण्यास वाजवी कारणे आहेत असे [1][प्राधिकरणास] आढळून येईल त्या बाबतीत [1][प्राधिकरणास] त्याच्या स्थितीची तपासणी करता येईल व त्या प्रयोजनार्थ जलदाबाची चाचणी नसलेली अशी कोणतीही चाचणी करता येईल व त्यास आवश्यक वाटेल तर त्यासाठी जमीन खणता येईल.

(२) तपासणी केल्यावर मलप्रणाल किंवा मलकुंड (सेसपूल) योग्य स्थितीत असल्याचे आढळून येईल तर [1][प्राधिकरण], त्याच्याकडून खोदण्यात आलेली कोणतीही जमीन, शक्य तितक्या लवकर पूर्ववत करील व त्याच्याकडून झालेल्या नुकसानीबद्दल भरपाई निश्चित करील व ती देईल.

**विवक्षित इतर कृत्यांस मनाई.**

५२. कोणतीही व्यक्ती,——

(अ) या प्रकरणान्वये [1][प्राधिकरणाच्या] प्राधिकाराच्या अधीन काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही बांधकामाची रचना करताना बुद्धिपुरस्सर अडथळा करणार नाही किंवा अशा बांधकामाची रचना करण्याच्या प्रयोजनार्थ जमिनीमध्ये रोवलेला कोणताही स्तंभ किंवा खांब उपटून काढणार नाही किंवा दूर करणार नाही किंवा उक्त प्रयोजनार्थ केलेले कोणतेही बांधकाम विरूपित करणार नाही किंवा ते नष्ट करणार नाही ; किंवा

(ब) [1][प्राधिकरणाच्या] मालकीचे आणि या प्रकरणाखालील [1][प्राधिकरणाची] कर्तव्ये व कार्ये यांच्याशी संबद्ध असलेले कोणतेही कुलूप, झडप, नळ किंवा इतर बांधकाम किंवा उपकरण हे जाणूनबुजून किंवा हयगयीने तोडणार नाही, त्यास हानी पोहोचणार नाही, ते फिरवणार नाही, ते उघडणार किंवा बंद करणार नाही किंवा त्यातून होणारा पुरवठा बंद करणार नाही किंवा त्यात अन्य रीतीने हस्तक्षेप करणार नाही; किंवा

(क) [1]['प्राधिकरणाच्या] मालकीच्या कोणत्याही बांधकामातून जाणारा कोणताही प्रवाह किंवा स्रोत यात अवैध रीतीने अडथळा निर्माण करणार नाही किंवा त्यातून मलप्रवाह काढणार नाही किंवा तो बळवणार नाही किंवा त्यातील मैला काढून नेणार नाही; किंवा

(ड) [1][प्राधिकरणाच्या] कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास, या प्रकरणान्वये आपली कर्तव्ये पार पाडताना अडथळा करणार नाही किंवा कोणत्याही मलप्रणालीच्या बांधकामासंबंधात तदन्वये कोणतेही निरीक्षण, तपासणी किंवा चौकशी करण्यासाठी आवश्यक असलेली साधने त्यास पुरवण्यास नकार देणार नाही किंवा त्यात बुद्धिपुरस्सर हयगय करणार नाही.

**प्रवेश, सर्वेक्षण इत्यादीचा अधिकार.**

५३. (१) [1][प्राधिकरणाने] या बाबतीत प्राधिकृत केलेल्या त्याच्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास,——

(अ) कोणतेही निरीक्षण, सर्वेक्षण, मापणी, मूल्यमापन किंवा चौकशी करण्यासाठी;

(ब) पातळी मापन करण्यासाठी;

(क) भूपृष्ठाखालच्या जमिनीत खोदकाम करण्यासाठी किंवा छिद्र पाडण्यासाठी;

(ड) सीमा आखण्यासाठी व बांधकामाची नियोजित रचना करण्यासाठी;

(ई) चिन्हे लावून व खंदक खणून अशी पातळी, सीमा व रचना यासंबंधात खुणा करण्यासाठी; किंवा

(फ) या अधिनियमाच्या किंवा कोणत्याही नियमाच्या किंवा विनियमाच्या किंवा उपविधींच्या प्रयोजनार्थ इतर आवश्यक ती कोणतीही गोष्ट करण्यासाठी;

कोणत्याही परिवास्तूत किंवा परिवास्तूवर सहायकांसह किंवा सहायकांशिवाय किंवा कामगारांसह किंवा कामगारांशिवाय प्रवेश करता येईल :

---

[1] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ५ द्वारे "मंडळ" या शब्दाऐवजी हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

परंतु, या पोट-कलमान्वये अधिकारांचा वापर करताना, संबंधित [१][प्राधिकरणाचा] अधिकारी किंवा कर्मचारी, परिवास्तूच्या भोगवटादारांच्या सामाजिक व धार्मिक रूढीकडे योग्य ते लक्ष देईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये, अधिकारांचा वापर करताना कोणत्याही परिवास्तूत किंवा परिवास्तूवर प्रवेश करण्याचा हक्क कोणत्याही व्यक्तीला असेल तेव्हा, तिला या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये प्राधिकृत केलेल्या कोणत्याही कामासाठी किंवा माती, खडी किंवा इतर गोष्टी ठेवण्यासाठी किंवा अशा बांधकामापर्यंत पोहोचण्यासाठी किंवा असे काम करण्यासंबंधातील इतर कोणत्याही प्रयोजनासाठी कोणत्याही लगतच्या परिवास्तूत किंवा परिवास्तूवर त्याच रीतीने प्रवेश करता येईल.

(३) (अ) कोणत्याही जागी प्रवेश करण्याच्या प्रयोजनार्थ दार किंवा दरवाजा उघडणे किंवा अटकाव दूर करणे आवश्यक असल्याचे वाटेल तर ; व

(ब) मालक किंवा भोगवटादार अनुपस्थित असेल किंवा उपस्थित असताना दार, दरवाजा उघडण्यासाठी किंवा अटकाव दूर करण्यासाठी नकार देईल तर, कोणत्याही प्राधिकृत अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने अशा कोणत्याही जागी प्रवेश करण्यासाठी असे कोणतेही दार, दरवाजा उघडणे किंवा उघडण्याची व्यवस्था करणे किंवा इतर अटकाव दूर करणे किंवा दूर करण्याची व्यवस्था करणे यासाठी कोणत्याही जागेत प्रवेश करणे विधिसंमत असेल.

**तलाव, डबकी व विहिरी जंतुविरहित करण्याचा अधिकार.** ५४. [१][प्राधिकरणाने] त्या बाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास, मालकास किंवा भोगवटादारास, कोणताही असल्यास, नोटीस दिल्यानंतर, कोणताही तलाव, डबके किंवा विहीर स्वच्छ केल्याने कोणत्याही भयानक रोगाच्या प्रसाराला प्रतिबंध होईल किंवा त्यावर नियंत्रण राहील असे दिसून येईल तेव्हा, असा तलाव, डबके किंवा विहीर स्वच्छ किंवा जंतुविरहित करवून घेता येईल. स्वच्छ करवून घेण्याचा किंवा निर्जंतुकीकरणाचा खर्च मंडळ अशा तलावाच्या, डबक्याच्या किंवा विहिरीच्या मालकाकडून किंवा भोगवटादाराकडून वसूल करील.

## प्रकरण आठ

### शास्ती व कार्यपद्धती

**सर्वसाधारण शास्ती.** ५५. जी व्यक्ती या अधिनियमाच्या किंवा कोणत्याही नियमाच्या किंवा उपविधीच्या तरतुदींचे उल्लंघन करील किंवा या अधिनियमान्वये किंवा कोणत्याही नियमान्वये किंवा उपविधीन्वये दिलेल्या कोणत्याही नोटिशीचे, आदेशाचे किंवा मागणीपत्राचे अनुपालन करण्यात कसूर करील अशा कोणत्याही व्यक्तीस अपराधसिद्धीनंतर, एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल अशी दंडाची शिक्षा होईल व पहिल्या अपराधसिद्धीनंतर असे उल्लंघन करण्याचे किंवा कसूर करण्याचे चालू राहील त्या प्रत्येक दिवसासाठी पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल अशा आणखी दंडाची शिक्षा होईल.

**अपराधाची दखल.** ५६. अपराध घडल्यानंतर सहा महिन्यांच्या आत [१][प्राधिकरणाची] तक्रार आल्याशिवाय कोणतेही न्यायालय या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची दखल घेणार नाही.

**कंपन्यांचे अपराध.** ५७. (१) या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीकडून घडला असेल त्या बाबतीत अपराध घडण्याच्या वेळी कंपनीचे कामकाज चालविण्यासाठी कंपनीस जबाबदार असलेली प्रत्येक व्यक्ती, तसेच कंपनी ही अशा अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल व तदनुसार ते खटला भरण्यास व त्याप्रमाणे शिक्षा होण्यास पात्र असतील :

परंतु, अशा व्यक्तीने, अपराध आपल्या नकळत घडला किंवा असा अपराध घडू नये म्हणून आपण योग्य ती सर्व दक्षता घेतली होती असे सिद्ध केले तर, या पोट-कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही मजकुरामुळे अशी कोणतीही व्यक्ती कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

---

[१]. सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ५ द्वारे "मंडळ" या शब्दाऐवजी हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील कोणताही अपराध एखाद्या कंपनीकडून घडला असेल व असा अपराध कंपनीच्या कोणत्याही संचालकाच्या, व्यवस्थापकाच्या, सचिवाच्या किंवा इतर अधिकाऱ्याच्या संमतीने किंवा त्याने दुर्लक्ष केल्यामुळे घडला आहे किंवा असा अपराध त्याच्या कसुरीमुळे घडला आहे असे सिद्ध झाले असेल त्याबाबतीत, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी हा त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल व तो खटला भरला जाण्यास व त्याप्रमाणे शिक्षा होण्यास पात्र असेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनासाठी,—

(अ) "कंपनी" याचा अर्थ कोणताही निगमनिकाय असा होतो आणि त्यात भागीदारी संस्था किंवा व्यक्तींची अन्य संघटना यांचा समावेश होतो, आणि

(ब) "संचालक" याचा अर्थ भागीदारी संस्थेच्या संबंधात भागीदारी संस्थेतील भागीदार असा होतो.

**अपराध करणाऱ्या व नाव आणि पत्ता देण्याचे नाकारणाऱ्या व्यक्तीस अटक करण्याचा अधिकार.**

५८. जिने कलम ५५ खालील शिक्षापात्र अपराध केला असेल किंवा तिने तसा अपराध केला असल्याचा संशय असेल व जी, तशी मागणी करण्यात आल्यावर, आपले खरे नाव व पत्ता देण्याचे नाकारील किंवा तिच्याकडून देण्यात आलेले नाव व पत्ता अचूक नाही असे समजण्यास कारण असेल तर, याबाबतीत [1][प्राधिकरणाकडून] प्राधिकृत करण्यात आलेल्या [1][प्राधिकरणाच्या] कोणत्याही अधिकाऱ्याने अशा व्यक्तीस अटक करणे व निकटतम पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याकडे तिला सुपूर्द करणे हे विधिसंमत असेल, असा पोलीस अधिकारी, अशी व्यक्ती कमीत कमी विलंब करून दंडाधिकाऱ्यापुढे आणली जाईल यासाठी आवश्यक अशा वैध उपाययोजना करील.

**अपराध आपसात मिटवणे.**

५९. (१) [1][प्राधिकरणाच्या] सदस्य-सचिवास किंवा मंडळाने त्याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे प्राधिकृत केलेल्या अन्य कोणत्याही अधिकाऱ्यास, या अधिनियमाखाली, शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची कार्यवाही दाखल करण्यापूर्वी किंवा दाखल केल्यानंतर त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, दोन हजार रुपयांपेक्षा अधिक असणार नाही इतकी रक्कम, अपराध आपसमेळाच्या मार्गाने मिळविण्यासाठी अशा अपराधाचा दोषारोप ठेवण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून स्वीकारता येईल.

(२) अशी रक्कम देण्यात आल्यावर, उक्त व्यक्तीविरुद्ध त्याच अपराधाच्या संबंधात पुढील कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही.

## प्रकरण नऊ

## बाह्यनियंत्रण

**धोरणविषयक प्रश्नांवर [1][प्राधिकरणास] निदेश देणे.**

६०. (१) [1][प्राधिकरणास] आपली कर्तव्ये पार पाडताना किंवा कार्ये करताना, त्यास राज्य शासनाकडून वेळोवेळी देण्यात येतील अशा धोरणविषयक प्रश्नांवरील निदेशांद्वारे मार्गदर्शन करण्यात येईल.

(२) कोणतीही बाब तिच्याबाबत राज्य शासनाने पोटकलम (१) अन्वये निदेश द्यावा अशी आहे किंवा नाही असा प्रश्न उपस्थित झाल्यास, त्या बाबतीतील राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल.

---

[1]. सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम २५ याच्या कलम ५ द्वारे "मंडळ" या शब्दाऐवजी हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

**[1][प्राधिकरणाकडून] देण्यात येणारा वार्षिक अहवाल, आकडेवारी, विवरणे व इतर माहिती.**

६१. (१) [1][प्राधिकरण] प्रत्येक वित्तीय वर्ष संपल्यानंतर, शक्य तितक्या लवकर राज्य शासन निदेश देईल अशा तारखेपूर्वी व अशा नमुन्यात, मागील वित्तीय वर्षातील आपल्या कार्याचा वृत्तांत देणारा अहवाल तयार करील व तो राज्य शासनास सादर करील आणि या अहवालात [1][प्राधिकरणाकडून] पुढील वित्तीय वर्षात जी कार्ये हाती घेतली जाण्याची शक्यता असेल अशी कोणतीही कार्ये असल्यास, त्या कार्याचा सुद्धा वृत्तांत असेल. राज्य शासन, असा प्रत्येक अहवाल, त्यास तो मिळाल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडला जाईल अशी व्यवस्था करील.

(२) [1][प्राधिकरण] राज्य शासन वेळोवेळी मागवील अशी, [1][प्राधिकरणाच्या] प्रस्तावित किंवा विद्यमान कार्याच्या संबंधातील किंवा [1][प्राधिकरणाच्या] नियंत्रणाखालील इतर कोणत्याही बाबीची आकडेवारी व विवरणे आणि तपशील, राज्य शासन निदेश देईल अशा वेळी व अशा नमुन्यात व अशा रीतीने राज्य शासनास पुरवील.

## प्रकरण दहा

### संकीर्ण

**सहाय्य करण्यांचे स्थानिक संस्थांचे कर्तव्य.**

६२. (१) सर्व स्थानिक संस्था, [1][प्राधिकरण] या अधिनियमाखालील आपली कर्तव्ये पार पाडण्यासाठी व कार्य करण्यासाठी मागवील अशी मदत व सहाय्य करतील व अशी माहिती [1][प्राधिकरणास] पुरवतील आणि असे अभिलेख, नकाशे, योजना व इतर दस्तऐवज निरीक्षणासाठी व तपासणीसाठी (आणि आवश्यक असल्यास त्याच्या प्रती तयार करण्यासाठी) उपलब्ध करून देतील.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींस बाध न आणता, प्रत्येक स्थानिक संस्था, तशी मागणी करण्यात आल्यावर, वाजवी फी दिल्यानंतर, जागांचे वार्षिक मूल्य आकारणीच्या व कर, फी व भार लादण्याच्या संबंधातील आकारणी सूच्या व इतर संबंद्ध दस्तऐवज यातील उतान्यांच्या प्रमाणित प्रती [1][प्राधिकरणास] उपलब्ध करून देईल.

(३) या अधिनियमाच्या इतर तरतुदींस बाध न आणता आणि कोणत्याही स्थानिक संस्थेची त्या त्या वेळी ज्या कोणत्याही इतर कायद्याअन्वये रचना करण्यात आली असेल त्या कायद्यात काहीही, अंतर्भूत असले तरी या अधिनियमाखालील आपली कर्तव्ये व कार्ये पार पाडणे. [1][प्राधिकरणास] शक्य व्हावे म्हणून, राज्य शासनाच्या मते जे निदेश देणे आवश्यक किंवा इष्ट असेल असे निदेश राज्य शासनास कोणत्याही स्थानिक संस्थेस देता येतील आणि त्यानंतर अशा निदेशांचे पालन करणे हे त्या स्थानिक संस्थेचे कर्तव्य असेल.

**भरपाई देण्याचा सर्वसाधारण अधिकार.**

६३. या अधिनियमात अन्यथा स्पष्टपणे तरतूद करण्यात आली नसेल अशा कोणत्याही प्रकरणी [1][प्राधिकरणास] या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये [1][प्राधिकरणाकडे] विहित करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाराच्या वापरामुळे ज्या कोणत्याही व्यक्तीची हानी झाली असेल त्या व्यक्तीस, भरपाई म्हणून वाजवी रक्कम देता येईल.

**सद्भावनेने केलेल्या कृत्यांचे संरक्षण.**

६४. हा अधिनियम किंवा कोणतेही नियम, विनियम किंवा उपविधी यास अनुसरून, जी कोणतीही गोष्ट सद्भावनेने करण्यात आली असेल किंवा सद्भावनेने केल्याचे समजण्यात येत असेल किंवा सद्भावनेने करण्याचा हेतू असेल अशा कोणत्याही गोष्टीबद्दल राज्य शासन, [1][प्राधिकरण] किंवा सदस्य किंवा राज्य शासनाचा किंवा [1][प्राधिकरणाचा] कोणताही अधिकारी किंवा सेवक यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर वैध कार्यवाही दाखल करता येणार नाही.

---

१. सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम २५ याच्या कलम ५ द्वारे "मंडळ" या शब्दा-ऐवजी हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

## प्रकरण अकरा

### नियम, विनियम व उपविधी

६५. (१) राज्य शासनास, राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून, या अधिनियमाखाली नियम नियम करण्याच्या अधिकाराचा वापर करता येईल.

(२) या अधिनियमात इतरत्र असलेल्या नियम करण्यासंबंधातील कोणत्याही अधिकारास बाध न आणता, राज्य शासनास, या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्यासाठी म्हणून, या अधिनियमाशी सुसंगत असतील असे नियम करता येतील.

(३) या अधिनियमाखालील करण्यात आलेले सर्व नियम, पूर्वप्रसिद्धीच्या शर्तींच्या अधीन असतील.

(४) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असतांना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात मिळून एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे संमत होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे संमत होतील व असा निर्णय राजपत्रात अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या तारखेपासून अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच नियम अंमलात येईल किंवा यथास्थिती येणार नाही. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींचा वैधतेस बाध येणार नाही.

६६. (१) [1][प्राधिकरणास] राज्य शासनाची पूर्वमान्यता घेऊन, आपले कामकाज व्यवस्थित चालविण्यासाठी म्हणून हा अधिनियम व नियम यांच्याशी सुसंगत असतील असे विनियम करता येतील.

(२) उपरिनिर्दिष्ट अधिकाराच्या सामान्यतेस बाध न आणता, अशा विनियमात पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबीसाठी तरतूद करता येईल :—

(अ) [1][प्राधिकरणाच्या] आणि [1][प्राधिकरणाने] नियुक्त केलेल्या समित्यांच्या बैठका बोलावणे व त्या भरविणे, अशा बैठका ज्या वेळी व ज्या ठिकाणी भरावयाच्या असतील ती वेळ व ते ठिकाण अशा बैठकीत चालवावयाचे कामकाज व बैठकीची गणपूर्ती होण्यासाठी आवश्यक असलेल्या व्यक्तींची संख्या.

(ब) [1][प्राधिकरणाच्या] कर्मचाऱ्यांची सेवा भरती, त्यांची वेतने व भत्ते व त्यांच्या सेवेच्या इतर शर्ती ;

(क) [1][प्राधिकरणाच्या] कर्मचाऱ्यांचे अधिकार व त्यांचे कर्तव्ये ;

(ड) [1][प्राधिकरणाच्या] मालमत्तेचे व्यवस्थापन ;

(ई) [1][प्राधिकरणांच्या] वतीने मालमत्तेसंबंधी करार करणे व तिचे हस्तांतरण करणे व [1][प्राधिकरणाचे] आदेश व लेख अधिप्रमाणित करणे ;

(फ) सदस्य-सचिवास, कोणत्याही वित्तीय वर्षात, ज्या मर्यादेपर्यंत आवर्ती किंवा अनावर्ती स्वरूपाचा खर्च करता येईल ती मर्यादा ;

(ग) लेखे ठेवणे व [1][प्राधिकरणाने] ताळेबंद तयार करणे ;

(ह) या अधिनियमाखालील [1][प्राधिकरणाची] कर्तव्ये व कामे पार पाडण्याची कार्य पद्धती ;

---

१. सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ५ द्वारे "मंडळ" या शब्दाऐवजी हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

(आय) विनियमाद्वारे ज्यासाठी तरतूद करावयाची असेल किंवा तरतूद करता येईल अशी इतर कोणतीही बाब.

(३) पोट-कलम (१) अन्वये [१][प्राधिकरणाकडून] कोणतेही विनियम करण्यात येईतोपर्यंत, [१][प्राधिकरणास] जे करता येतील असे कोणतेही विनियम, राज्य शासनास करता येतील व अशा रीतीने करण्यात आलेले कोणतेही विनियम, [१][प्राधिकरणास] पोट-कलम (१) खालील आपल्या अधिकाराचा वापर करून बदलता किंवा ते विखंडित करता येतील.

उपविधी. ६७. (१) [१][प्राधिकरणास] राज्य शासनाच्या पूर्वानुमतीने, सर्वसाधारण जनतेवर परिणाम करणाऱ्या कोणत्याही बाबीसंबंधात, हा अधिनियम व नियम यांच्याशी सुसंगत असतील असे उपविधी करता येतील.

(२) उपरिनिर्दिष्ट अधिकारांच्या सामान्यतेस बाध न आणता अशा उपविधीमध्ये पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबीसाठी तरतूद करता येईल :—

(अ) घरगुती किंवा इतर प्रयोजनासाठी पाणीपुरवठा करण्यासंबंधातील अटी व शर्ती ;

(ब) मिटर बसवणे किंवा त्याच्या जोडण्यांचे हस्तांतरण व त्याचा वापर, मिटर व्यवस्थित ठेवणे, त्यांची चाचणी घेणे त्यांना जोडलेले नळ तोडणे व नव्याने नळ जोडणे, ग्राहकाने द्यावयाची अनामत रक्कम धरून त्या बाबतीतील फी, भाडे व इतर आकार व त्यांच्याशी संबंधित गोष्टी ;

(क) [१][प्राधिकरणास] मलप्रणालाशी जोडणी करण्यासाठी द्यावयाची फी, भाडे व इतर आकार व अशा जोडणीसंबंधातील इतर अटी व शर्ती ;

(ड) ग्राहकांना देण्यात येणाऱ्या सेवाबद्दल [१][प्राधिकरणास] द्यावयाची इतर कोणतीही फी व आकार ;

(ई) उपविधीद्वारे ज्यासाठी तरतूद करावयाची असेल किंवा तरतूद करता येईल अशी इतर कोणतीही बाब ;

(यथार्थ अनुवाद)

प. ग. पाटील,
भाषा संचालक,
महाराष्ट्र राज्य.

---

१. सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ५ द्वारे "मंडळ" या शब्दाऐवजी हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.